

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई
MAHARASHTRA STATE COMMISSION FOR WOMEN
समान हक्क

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //


## महाराष्ट्र राज्य महिला आयोग

गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ – २६५९०८७८

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

chairperson.mscw@gmai.com
www.vijayarahatkar.co.in
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
vijayarahatkar.wordpress.com


## लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा, 2012

# माहिती पुस्तिका



रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

## महाराष्ट्र राज्य महिला आयोग

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग

अध्यक्षा



विजया रहाटकर

सदस्य



नीता राजेंद्र ठाकरे

सदस्य



गयाताई शिवाजीराव कराड

सदस्य



देवयानी ठाकरे

सदस्य



विंदा कीर्तीकर

सदस्य



ॲड.आशा लांडगे

पदसिद्ध सदस्य



दत्ता पडसलगीकर
पोलीस महासंचालक

सदस्य सचिव



डॉ. मंजूषा सुभाष मोळवणे

# Helpline by

## Maharashtra State Commission for Women

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

## 'Suhita'

**THE MSCW Can Help Women in Distress**

Women Affected by Violence or Anyone on her behalf May Call on..

Helpline

# 7477722424

## Please Contact 'MSCW'

Commission Contact

- mscwmahilaayog@gmail.com
- www.mscw.org.in
- Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
- Maharashtra women commission (@mscw_bandra)
- Tejaswini App



## लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा, 2012

# माहिती पुस्तिका

---

## महाराष्ट्र राज्य महिला आयोग

**Publisher**

Maharashtra State Commission for Women
Mhada Bhavan, Kalanagar,
Bandra(E), Mumbai - 400051
Tel. : 022-26590878
Email : mscwmahilaaayog@gmail.com
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)

**Printer**

Ashutosh Press, A2/264
Shah and Nahar Industrial Estate,
S.J.Marg, Lower Parel, Mumbai - 13

## Content Courtesy :

**NATIONAL COMMISSION FOR PROTECTION OF CHILD RIGHTS (NCPCR)**
5th Floor, Chandralok Building,
36, Janpath, New Delhi – 110001 India
Visit http://www.ncpcr.gov.in

@NCPCR /NCPCR, Official

You tube/channel/NCPCR

// स्त्रीशक्तितुल्या सदा //

# परिभाषा (संक्षेप)

CR - Age of Criminal Responsibility गुन्ह्याच्या जबाबदारीचे वय

CCI - Child Care Institution बाल देखभाल गृह

CNCP - Children in Need of Care and Protection देखभाल आणि संरक्षणाची आवश्यकता असणारी बालके

Cr.P.C. - Criminal Procedure Code फौजदारी दंड प्रक्रिया संहिता

CS - Child Sexual Abuse बाल लैंगिक अत्याचार

CSEC - Commercial Sexual Exploitation of Children बालकांचे व्यावसायिक लैंगिक शोषण

CWC - Child Welfare Committee बाल कल्याण समिती

DCPU - District Child Protection Unit जिल्हा बाल संरक्षण दल

DLSA - District Legal Services authority जिल्हा विधी सेवा प्राधिकरण

ICPS - Integrated Child Protection Schemea एकात्मिक बाल संरक्षण योजना

IPC - Indian Penal Code भारतीय दंड संहिता

JJ - Juvenile Justice (Care and Protection of Children) Act, 2015 अल्पवयीन न्याय कायदा, 2015

JWO - Juvenile Welfare Officer अल्पवयीन कल्याण अधिकारी

MLC - Medico Legal Case न्याय वैद्यकीय खटला

NCPCR - National Commission for Protection of Child Rights राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग

NCRB - National Crime Records Bureau राष्ट्रीय गुन्हे नोंद मंडळ

NGO - Non-Governmental Organization बिगर सरकारी संस्था

POCSO - Protection of Children from Sexual Offences बालकांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण (पोक्सो)

SJPU - Special Juvenile Police Unit विशेष अल्पवयीन पोलिस दल

SCPCR - State Commission for Protection of Child Rights राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

SCPS - State Child Protection Society राज्य बाल संरक्षण समिती

SPP - Special Public Prosecutor विशेष सरकारी वकील

UN - United Nations संयुक्त राष्ट्रसंघ

UNCRC - United Nations Convention on the Rights of the Child बाल हक्कांवरचा संयुक्त राष्ट्रसंघाचा करार

VCS - Victim Compensation Scheme पीडित मदत योजना

# Preface



Children are the future of our nation - preserving their innocence and promoting their growth is of primary importance. The Protection of Children from Sexual Offences Act, 2012 (POCSO Act) is an instrumental legislation that aims to protect the rights of children against sexual exploitation and abuse and safeguard the interests of the child when they are exposed to judicial processes. The enactment and implementation of this Act has brought the underlying issues related to child sexual abuse to the forefront of our country on a greater scale.

Child sexual exploitation is an offence that has been omnipresent yet nearly invisible. The targets, i.e., vulnerable children seldom speak of the incidents perpetrated on them. More often than not, the perpetrators are persons known to the child or with whom the child has developed an initial relationship of trust. The psychological trauma inflicted on the child as a result of incidents of sexual exploitation is grave and requires quick attention. Further, with the expansive use of the internet, the vulnerability of young users falling prey to online sexual exploitation is also imminent.

The Indian Constitution is the pioneer for the protection of children in our country. The Constitution has explicitly enshrined under various articles, rights that create the environment and opportunities to foster holistic development of children. It also introduces various rights aimed at providing conducive conditions for growth and well-being including, amongst others, the right to free and compulsory elementary education for all children in the 6-14 year age group and the right to be protected from any hazardous employment till the age of 14 years.

Rights under the Directive Principles of State Policy include the right to be protected from being abused and forced by economic necessity to enter occupations unsuited to a child's age or strength, the right to equal opportunities and facilities to develop in a healthy manner and in condition of freedom and dignity, and the guaranteed protection of childhood and youth against exploitation and against moral and material abandonment.

The United Nations Convention on the Rights of the Child adopted on 20 November, 1989 was the first international legal document binding different nations to affirm the full range of human rights for all children —including civil, cultural, economic, political and social rights. India became a signatory to the Convention in 1992 and has since taken steps to ensure the full protection of the rights in accordance with the Convention.

The POCSO Act, which contains mechanisms to protect the child against abuse and also ensure a child friendly experience of the victim with the judicial system, is the need of the hour. Designation of special courts to conduct speedy trials, installation of appropriate mechanisms for recording evidence and reporting would increase the boldness of victims to speak up about instances of violation.

On the occasion of National Conference on POCSO ACT, MSCW is happy to publish this very useful literature. It is in both language & contain userbook on POCSO & summary of criminal amendment act, 2018. It will be a great tool, which based on content published by NCPCR to increase awareness on the provisions of the POCSO Act in a simple yet effective manner. I am confident that it will be a great resource for all relevant stakeholders while administering to the needs of children.

Enforcement of laws are inadequate to tackle the menace of child sexual abuse. The collective efforts of citizens, community and parents is crucial to ensure that children are guaranteed a life which they can live with utmost innocence, dignity and freedom.

**Vijaya Rahatkar**
Chairperson,
Maharashtra State Commission for Women

प्रकरण - १

# बालक लैंगिक अत्याचाराचे आकलन

## प्रस्तावना

बालकांबरोबरचे लैंगिक गैरवर्तन स्पष्ट करण्यासाठी बाल लैंगिक अत्याचार (सीएसए) हा शब्द व्यापक अर्थानं वापरला जातो. सोप्या भाषेत, जेव्हा एखादी व्यक्ती तिच्या/त्याच्या लैंगिक समाधानासाठी, व्यावसायिक फायद्यासाठी किंवा दोन्हीसाठी बालकांचा वापर लैंगिकतेसाठी करते/करतो तेव्हा बालक लैंगिक अत्याचार घडतो. कलम – 2 (1) (डी) च्या व्याख्येनुसार अठरा वर्षांपेक्षा कमी वयाची कोणतीही व्यक्ती 'बाल' असते.

**बालक संरक्षणाचे उपाय – एक गरज**

बाल लैंगिक अत्याचार थांबवणं आवश्यक आहे. बाल लैंगिक अत्याचार थांबविण्यासाठी भारतीय समाजानं देशात एकत्रित प्रयत्न करायला हवेत. बालकांना सुरक्षित आणि संरक्षित ठेवण्याची जबाबदारी केवळ सरकारची नव्हे तर आपल्या बालकांना हिंसामुक्त मोकळ्या वातावरणात सन्मानाचं जिणं जगता यावं यासाठी सुरक्षित आणि संरक्षित वातावरण उपलब्ध करुन देणं ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

बाल लैंगिक अत्याचाराच्या घटना समजून घेण्यासाठी पुढील घटकांवर विचार करणं आवश्यक आहे :

### 1. सामर्थ्य आणि विश्वास यांचा प्रभाव

बाल लैंगिक अत्याचाराच्या बहुतेक प्रकरणांत, गुन्हेगारानं बालकाचा विश्वास संपादन केलेला असतो किंवा ते बालक त्याच्या सामर्थ्याखाली असतं. गुन्हेगार हा बहुतकेदा अत्याचारग्रस्त बालकाच्या परिचयातलाच असतो. गेल्या काही वर्षांतल्या राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोच्या (एनसीआरबी) अहवालानुसार 80 ते 90% प्रकरणात गुन्हेगार हा अत्याचारग्रस्त बालकाला 'ज्ञात' असतो. अर्थात अशीही काही उदाहरणे असू शकतात जिथं गुन्हेगार अगदीच अनोळखी असतो.

### 2. गुन्हेगाराचं वय

गुन्हेगार तरुण किंवा प्रौढ असू शकतो म्हणजेच तो अठरा वर्षे वयाच्या आतला किंवा पुढचा असू शकतो. उदाहरणार्थ चार–पाच वर्षांच्या अल्पवयीन बालकींवर आजोबा किंवा इतर प्रौढांनी अत्याचार केल्याच्या अनेक घटना नोंदल्या गेल्या आहेत. त्याचप्रमाणं तेरा चौदा वर्षांच्या बालकांनी त्यांच्याच वर्गमित्रांवर किंवा इथे लहान बालकांवर लैंगिक अत्याचार केल्याचीही उदाहरणं आहेत.

त्यामुळं लैंगिक क्रियांमध्ये बालकंसुद्धा काहीवेळा गुंतलेली असतात हे लक्षात घ्यायला हवं. एखाद्या बालकाला लैंगिक अपराधी म्हणून संबोधित करण्यापूर्वी काळजीवाहक आणि संरक्षकांनी बालकांच्या वय आणि विकासाच्या योग्य लैंगिक क्रियाकल्पांची जाणीव ठेवणं आवश्यक ठरतं.

**पोक्सो कायद्याचा सोपा अर्थ असा आहे की –**

- बालकासोबत लैंगिक क्रिया करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती (मग ती बालक असली तरी) विरोधात खटला दाखल करता येऊ शकतो.



- बालकांनी एकमेकांसोबत किंवा प्रौढ आणि बालकांमधील लैंगिक संबंध सहमतीने झाले असले तरी हा कायदा त्यास मान्यता देत नाही.
- हा कायदा लैंगिकदृष्ट्या तटस्थ आहे.

## 3. गुन्हेगाराचा परिचय

गुन्हेगार कोणीही असू शकतं – पुरुष, स्त्री, तृतीयपंथी इत्यादी. बहुतांशवेळा गुन्हेगार पुरुष असतो पण ते तसंच असतं असं नाही. कधीकधी अशीही प्रकरणं असतात ज्यात स्त्री मुख्य गुन्हेगार असते किंवा तिनं गुन्हा केलेला असतो. गुन्हेगाराचं लिंग किंवा त्याचं बाह्य रुप यावरुन तो/ती बाल लैंगिक अत्याचारी आहे अथवा नाही हे ठरत नाही. गुन्हेगाराची सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक किंवा शैक्षणिक पार्श्वभूमी कोणतीही असू शकते. ते कदाचित विवाहित असतील किंवा नसतील. ते मानसिकदृष्ट्या स्थिर असू शकतात किंवा नसतात. थोडक्यात, अगदी सर्वसामान्य माणूससुद्धा बाल लैंगिक गुन्हेगार असू शकतो.

## 4. गुन्हेगार आणि बालकातील संबंध

बहुतांश प्रकरणांमध्ये गुन्हेगार बालकाच्या परिचयाचा असतो. बिगरसरकारी संस्थांचे अहवाल–अभ्यास यातून असं आढळलं आहे, की स्त्री आणि बालकांबरोबरच्या लैंगिक हिंसेच्या बहुतांश प्रकरणांमधला आरोपी हा माहितीतली किंवा नात्यातली व्यक्ती असते. वडील, सावत्र वडील, आजोबा, काका, चुलत भाऊ–बहिणी असे कुटुंबातले जवळचे सदस्यसुद्धा आरोपी असू शकतात.

बागेतली अथवा एकाकी रस्त्यावरची बाहेरची अनोळखी व्यक्तीच बालकांवर अत्याचार करेल, ही बाल लैंगिक अत्याचारातली सर्वात मोठी गैरसमजूत आहे. उलट घर, शाळा, मैदान अशा परिचयाच्या ठिकाणीच आपल्या बालकांना सुरक्षित ठेवण्याची गरज आहे.

## 5. अत्याचारग्रस्त बालकाचा परिचय

अत्याचारग्रस्त बालकाचं लिंग कोणतंही असू शकतं. बालकींप्रमाणेच बालकांनासुद्धा लैंगिक अत्याचारांचा तितकाच धोका असतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते दर चारपैकी एक मुलगी आणि दर सात बालकांपैकी एका मुलगा जगात लैंगिक अत्याचारांना बळी पडतो. अर्थात आपल्यावर लैंगिक अत्याचार झाले आहेत याची कबुली न देण्याची किंवा ते उघड न करण्याची शक्यता बालकांमध्ये जास्त असते. महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या 2007 मधल्या सर्वेक्षणानुसार एकापेक्षा अधिक वेळा लैंगिक अत्याचार सोसलेल्या बालकांमध्ये 57 टक्के बालकगे आहेत.

सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक किंवा शैक्षणिक पार्श्वभूमी कोणतीही असली तरी लैंगिक अत्याचाराला बळी पडण्याचा धोका सर्व बालकांवर आहे. तर, काही बालकं इतरांपेक्षा अधिक धोक्यात आहेत उदाहरणार्थ –

- शारीरिक दुर्बलता असणारी बालकं
- निम्न आर्थिक–सामाजिक पार्श्वभूमी असणारी बालकं. उदाहरणार्थ – बालकांवर अत्याचार करुन पाहणाऱ्या संभाव्य गुन्हेगारांची नजिकता असलेल्या भागात राहणारी बालकं, आई–वडील कामावर गेल्यानंतर लक्ष द्यायला कोणी नसलेली बालकं इत्यादी.




- स्वत्त्वाची जाणीव नसलेली बालकं.
- स्वतःच्या लैंगिकतेबद्दल शंका असणारी बालकं.
- एकाकी असणारी किंवा मित्र–आप्तांचा गोतावळा नसणारी बालकं.
- घरातलं वातावरण चांगलं नसणारी बालकं. उदाहरणार्थ – ज्यांच्या घरात सतत वादविवाद चालू असतात, ज्या घरांमध्ये बालकांना पुरेसं वात्सल्य मिळत नाही किंवा त्यांच्याकडं लक्ष दिलं जात नाही.

## 6. 'शारीरिक स्पर्शा'द्वारे अत्याचार

काही घटनांमध्ये, गुन्हेगारानं स्पष्टपणे बालकाला शारीरिक स्पर्श केलेला असतो. संभोग, बालकाच्या गुप्तांगांशी खेळणे किंवा गुन्हेगारानं त्याच्या गुप्तांगाला बालकाला स्पर्श करायला लावणं, लैंगिक हेतूनं बालकाच्या कोणत्याही अवयवाला स्पर्श करणं, लैंगिक हेतूनं चुंबन घेणं इत्यादी.

## 7. 'अशारीरिक संपर्का'द्वारे अत्याचार

बालकाला प्रत्यक्ष स्पर्श न करता लैंगिक अत्याचार केले जाऊ शकतात. गुन्हेगाराकडून बालकाला अश्लिल

व्हिडिओ (पोर्नोग्राफी) किंवा छायाचित्रं दाखवणं, बालकाचा उपयोग अश्लिल साहित्यात करणं, बालकाला उद्देशून विषयासक्त हावभाव करणं, लैंगिक खेळ खेळणं, लैंगिक हेतू बाळगून बालकाशी इंटरनेटच्या माध्यमातून संपर्क ठेवणं इत्यादी. एखाद्या बालकाने जरी वरील अपराध केले तर त्याच्या विरोधात देखील पोक्सो कायद्यांतर्गत कारवाई होईल. फरक इतकाच की अल्पवयीन न्याय (बालकांची देखभाल आणि संरक्षण) कायदा, 2015 अन्वये कार्यवाही केली जाईल.

## 8. अल्पवयीन न्याय कायदा, 2015 आणि पोक्सो कायदा, 2012 यातील परस्पर संबंध

अ) पोक्सो कायद्याअंतर्गत येणाऱ्या अत्याचारग्रस्त बालकांना देखभाल आणि संरक्षणाची गरज असू शकते.

- अल्पवयीन न्याय कायदा, 2015 (JJ ACT) मधल्या कलम 30 (Xiii) नुसार स्थानिक पोलिस किंवा 'एसजीपीयू' यांनी पोक्सो कायदा, 2012 अंतर्गत नोंदवलेल्या बालकाला देखभाल आणि संरक्षणाची गरज असेल तर अत्याचारग्रस्त बालकाच्या पुनर्वसनाची कार्यवाही बालकल्याण समितीने (सीडब्ल्यूसी) ने पूर्ण करायची आहे.

- पोक्सो कायद्यातल्या कलम 19 (6) अंतर्गत, स्थानिक पोलिस किंवा 'एसजीपीयू'यांनी बालकावरच्या लैंगिक अत्याचाराची खबर चोवीस तासांच्या आत 'सीडब्ल्यूसी'ला देणे आवश्यक आहे. संबंधित बालकाला देखभाल–संरक्षणाची आवश्यकता असल्यास त्याचीही माहिती त्यांनी दिली पाहिजे. पोस्को नियम, 2012 मधली नियम 4 (3) 'सीडब्ल्यूसी'पुढे बालकाला सादर करण्याच्या तीन परिस्थिती स्पष्ट करतो. एक – बालकाच्या घरात किंवा आसपास राहणाऱ्या व्यक्तीकडून गुन्हा घडला आहे किंवा गुन्ह्याचा प्रयत्न झाला आहे किंवा गुन्हा घडण्याची शक्यता आहे. दोन – बालकाला पालकांचा आधार नाही. तीन – मुलगा घर–निवारा नाही किंवा पालकांचा आधार नाही.

- बालकाला दाखल केल्यानंतर पोक्सो नियमातील नियम 4 (4) नुसार, बालकाच्या हितासाठी त्याला कुटुंबातून किंवा एकत्रित घरातून बाल निवारा गृह किंवा आधार गृहात हलवावे काय, या संबंधीचा निर्णय 'सीडब्ल्यूसी'नं तीन दिवसात केला पाहिजे. यासाठी 'सीडब्ल्यूसी'ला सामाजिक कार्यकर्त्यांची मदत घेता येईल.

- पोक्सो नियमातील नियम 4 (5) 'सीडब्ल्यूसी'नं ध्यानात घेण्याचे सात मुद्दे स्पष्ट करतो. बालकाचे सर्वोच्च हित जपण्यासाठी त्याला कुटुंबाच्या ताब्यातून बालकाला काढून घ्यायचे की नाही याचा निर्णय करण्यासाठीचे हे मुद्दे आहेत. मात्र हे करताना बालकाची कोणत्याही पद्धतीनं गैरसोय होणार नाही किंवा चौकशीदरम्यान त्याला इजा होणार नाही, याची खबरदारी'सीडब्ल्यूसी'नं घ्यावी.

ब) बाल कल्याण समिती (सीडब्ल्यूसी) नं अत्याचारग्रस्त बालकाला आधार देऊ शकणाऱ्या व्यक्तीची नेमणूक करावी.

- स्थानिक पोलिस किंवा 'एसजेपीयू'यांच्याकडून अत्याचारग्रस्त बालक दाखल झाल्यावर, पोक्सो नियम आधारीत नियम 4 (7) नुसार 'सीडब्ल्यूसी'नं खटल्याच्या सुनावणी आणि तपासादरम्यान संबंधित बालक आणि त्याच्या कुटुंबाला आधार देणाऱ्या व्यक्तीची नियुक्ती करावी.
- स्थानिक पोलिस किंवा'एसजेपीयू'यांनी 'सीडब्ल्यूसी'ने उपलब्ध करुन दिलेल्या व्यक्तीबद्दलची माहिती चोवीस तासाच्या आत विशेष न्यायालयाला लेखी स्वरुपात द्यावी.
- नियम 4 (8) नुसार आधार देण्यासाठी नियुक्त केलेल्या व्यक्तीनं बालकाबाबतची गोपनीयता जपली पाहिजे आणि बालकाचे मातापिता–पालक किंवा बालकाचा विश्वास ज्यांच्यावर आहे त्यांना खटल्याच्या कार्यवाहीबद्दलची सर्व ती माहिती दिली पाहिजे.
- बालकाच्या किंवा त्याच्या मातापित्यांच्या / पालकांच्या किंवा ज्यांच्यावर बालकाचा विश्वास आहे अशा कोणाच्याही विनंतीवरुन 'सीडब्ल्यूसी' आधार देणाऱ्या व्यक्तीची सेवा खंडीत करु शकते. यासाठी वेगळ्या कारणाची आवश्यकता नाही. नियम 4(10)

**क) पोक्सो कायदा, 2012 मध्ये स्पष्ट केल्यानुसार'जेजेबी'नं बालसुलभ प्रक्रियांचा अवलंब केला पाहिजे.**

पोक्सो कायदा, कलम 34 (1) सांगतो, की एखाद्या बालकानं पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा केला तर त्याला 'जेजे' कायदा लागू होतो. जेजेबीअंतर्गत कार्यवाही इन–कॅमेरा झाली पाहिजे. खटल्याचा तपास, सुनावणी या दरम्यान, पोक्सो कायद्याअंतर्गत आरोपी असणाऱ्या बालकापुढं अत्याचारग्रस्त बालकाला आणता कामा नये. अत्याचारग्रस्त बालकाचे सर्वोतोपरी संरक्षण झाले पाहिजे.

**ड) पोक्सो कायद्यानुसार 'जेजे मधील जबाबदार व्यक्तींची भूमिका**

गुन्हा घडला आहे किंवा घडण्याची शक्यता आहे याची खबर मिळाल्यानंतर स्थानिक पोलिस किंवा 'एसजेपीयू' यांनी पुढील पावले उचलली पाहिजेत –

तक्रारीची नोंद कलम 19 (2) (अ)

- बालकाला देखभाल–संरक्षणाची गरज असल्याची चाचपणी कलम 19 (5)

- तातडीची वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देणे नियम 5 कलम 19 (5)
- दंडाधिकाऱ्याकडून जबाब नोंदवून घेण्याची व्यवस्था करणे (कलम 25)
- विशेष न्यायालय आणि बाल कल्याण समितीला वर्दी देणं कलम 19 (6)
- गुन्ह्याचा खबरी आणि अत्याचारग्रस्त यांना माहिती देणं

पोक्सो नियम 3 (1) अन्वये जिल्हा बालक संरक्षण दलाने दुभाषी, अनुवादक आणि विशेष शिक्षकांची संपर्क यादी तयार ठेवावी आणि एसजीपीयू, स्थानिक पोलिस, दंडाधिकारी आणि विशेष न्यायालय यांच्या गरजेमुसार त्यांना उपलब्ध करुन द्यावी

### ढ) वय निश्चिती

पोक्सो कायदा कलम 34 (2) नुसार विशेष न्यायालयाने संबंधित व्यक्ती बालक आहे किंवा नाही याची निश्चिती केली पाहिजे. विशेष न्यायालयाने वयाबाबत समाधान करुन त्याची कारणमिमांसा लेखी स्वरुपात नोंदवावी. वय निश्चितीची प्रक्रिया जेजे कायदा, 2015 च्या कलम 94 मध्ये स्पष्ट करण्यात आली आहे.

### फ) कायदेशीर सहाय्य

सुनावणी दरम्यान मोफत कायदेशीर सहाय्य मिळण्याच्या अत्याचारग्रस्त बालकाच्या अधिकाराचे संरक्षण पोक्सो कायदा कलम 40 मध्ये करण्यात आलं आहे.

## काही महत्वाच्या परिभाषा

- **बालकांचे व्यावसायिक लैंगिक शोषण (सीएसईसी)**

बालकांच्या व्यावसायिक लैंगिक शोषणाची व्याख्या – बालकाला किंवा त्रयस्थ व्यक्तीला पैसे किंवा अन्य कोणत्याही स्वरुपात मोबदला देऊन प्रौढाने केलेला लैंगिक अत्याचार.

बालकाला लैंगिक साधन मानून त्याचा व्यावसायिक उपयोग करण्याची ही प्रक्रिया आहे. बाल वेश्या व्यवसाय, बालकांचे लैंगिक छायाचित्रण आणि लैंगिक अत्याचारासाठी बालकांची विक्री यांचा सीएसईसीमध्ये समावेश होतो.

- **बाल लैंगिक पर्यटन**

बालकासोबत लैंगिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी स्वतःचा जिल्हा किंवा देश सोडून प्रवास करणारी व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती बालकांचे लैंगिक शोषण करतात त्याला बाल लैंगिक पर्यटन (चाईल्ड सेक्स टुरिझम)

म्हणतात. बाल लैंगिक पर्यटक हे अंतर्देशीय किंवा आंतरराष्ट्रीय असू शकतात. बालकाच्या सहवासात येण्यासाठी निवास, प्रवास आणि प्रवासाशी संबधित इतर सेवांचा यात समावेश होतो. पैसे, अन्न, कपडे किंवा अन्य मार्गानं बालकाला किंवा त्रयस्थाला लैंगिक संबंधांबद्दलचा मोबदला दिला जातो. बाल लैंगिक पर्यटक विवाहीत/अविवाहीत, स्त्री/पुरुष, परकीय/स्वदेशी, धनिक/सामान्य किंवा उच्च सामाजिक-आर्थिक वर्गातला किंवा अत्यंत सामान्य स्थितीतला असा कोणीही असू शकतो. कोणीतीही विशिष्ट अशी शारीरिक ठेवण, सामाजिक वर्तणूक किंवा नोंद घेता येईल असं वेगळेपण त्यांच्याकडं नसतं. या पर्यटकांची तीन प्रकारे विभागणी करता येईल.

- संधीसाधू बाल लैंगिक पर्यटक - नाना क्लृप्त्या करुन बालकांना शोषणाच्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करणारे संधीसाधू बाल लैंगिक गुन्हेगार असतात. पर्यटक असल्यानं आपली ओळख लपून राहिल किंवा काही केलं तरी आपल्याला शिक्षा होणार नाही, याचा गैरफायदा घेण्याचा यांचा प्रयत्न असतो.
- बाल लैंगिक पर्यटनाला प्राधान्य देणारे - खास करुन तरुण आणि किशोरवयीन बालकांचा लैंगिक उपभोग घेण्याचे उद्दीष्ट ठेवून आलेले पर्यटक इच्छापुर्तीसाठी सक्रीय असतात.
- 'पीडोफाईल' - किशोरावयीन बालकांबरोबरच्या लैंगिकतेबद्दल विशेष आकर्षण असणारे पर्यटक.

- **ऑनलाईन लैंगिक अत्याचार**

इंटरनेटवरील विविध सोशल नेटवर्कींग साईट्स, ऑनलाईन गेम्स, मोबाईल फोन यांच्या माध्यमातून ऑनलाईन लैंगिक अत्याचार घडतो. बालक, तरुणांना सायबर बलात्कार, लैंगिक शोषण, मानसिक अत्याचार यांचा अनुभव येऊ शकतो. बालकं ओळखीच्या किंवा अनोळखी लोकांकडून ऑनलाईन अत्याचाराला बळी पडू शकतात. गुन्हेगार बालकाशी दिवसा-रात्री केव्हाही संपर्क करतात. बालकाला सुरक्षित वाटणाऱ्या त्याच्या शयनकक्षातही ऑनलाईन अत्याचार घडू शकतात. यातून इतरांबरोबर छायाचित्रे, व्हिडीओ शेयर करणं, त्यांचं जतन करणं हे प्रकार घडतात.




## भारतामधील बालकांविरुद्धचे लैंगिक गुन्हे

- **भारतीय बालकांना लैंगिक गुन्ह्यांचा धोका आहे का ?**

अगदी अलिकडेपर्यंत हा प्रश्न विचारला की एक तर गोंधळलेली शांतता निर्माण व्हायची किंवा असे प्रकार फारच कमी असल्याचं बोललं जायचं किंवा आवर्जून बोलावं इतकं महत्त्व या विषयाला नसल्याचं सांगितलं जायचं. परंतु, 2007 मध्ये महिला व बाल विकास मंत्रालयानं बाल अत्याचारांवरच्या राष्ट्रव्यापी सर्वेक्षणांचे निकाल जाहीर केले, ज्यात 13 राज्यांमधली साडेबारा हजार बालकं सहभागी झाली होती. यातल्या अर्ध्याहून अधिक म्हणजे 53% बालकांनी म्हटलं की एकदा किंवा अनेकदा ते लैंगिक अत्याचारांना बळी पडले आहेत. याचा

अर्थ असा की दर दोन बालकांपैकी एकाचं लैंगिक शोषण झालेलं आहे. यातल्या 20% बालकांनी सांगितलं की गंभीर स्वरुपाच्या लैंगिक अत्याचारांना त्यांना तोंड द्यावं लागलं. अत्याचार सोसलेल्या या बालकांमधले 57 टक्के मुलगे होते.

भारताच्या सन 2014 च्या राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोच्या (एनसीआरबी) मते अठरा वर्षांपर्यंतच्या वयातल्या एक लाख लोकसंख्येपैकी 20.1 बालकांवर लैंगिक अत्याचार झालेले आहेत. बालकांवर झालेल्या बलात्कारांची 2015 मधली देशातली नोंद एकूण 10 हजार 854 होती. सन 2014 मध्ये ती 13 हजार 766 होती. म्हणजे ती 26.8 टक्क्यांनी घटली. पण पोक्सो कायद्याच्या अंतर्गत येणाऱ्या बाल लैंगिक अत्याचारांची संख्या वाढली आहे.

## बाल लैंगिक अत्याचाराची कारणे

जगातल्या सर्व समाजांमध्ये बाल लैंगिक अत्याचाराच्या घटना घडतात आणि त्याच्या कारणांमध्ये खूप तफावत आढळते. काही शक्यता अशा आहेत –

- **लैंगिकतेबद्दलच्या चर्चांवर असणारं बंधन**

लिंग आणि लैंगिकता त्यातही विशेषतः बालकांशी संबंधित या बाबींची चर्चा करायला भारतात एक प्रकारची अनिच्छा आणि सांस्कृतिक लाजाळूपणा आढळतो. बालकां संदर्भातल्या अशा विषयांवर बोलणं प्रौढांना खूप अवघड आणि लाजिरवाणं वाटतं कारण बहुतेकदा अशा 'चर्चा' कशा कराव्यात याची त्यांना अजिबातच कल्पना नसते. पुरेसं प्रशिक्षण आणि योग्य ज्ञानाच्या अभावी लैंगिकते बद्दलच्या खुळचट कल्पनांचा प्रसार झालेला असतो आणि आपण किशोरावस्थेततल्या बालकांना त्याच अपरिचित, जोखीमीच्या आणि अज्ञानाच्या धोक्यात मोकळं सोडून देतो. या विषयाबद्दलच्या या मौनातूनच लैंगिक अत्याचारांबद्दलचा मुकाटपणा आणि त्याबद्दल अवाक्षरही न काढण्याची शांतता जन्माला येते. कित्येक लैंगिक अत्याचार या मौनात दबून जातात, त्याची कुठं नोंदही होत नाही.

- **लिंग आधारित हिंसेबद्दलची सहनशीलता**

स्त्री आणि बालकांवरील हिंसाचाराकडं दुर्लक्ष करण्याची किंवा काही प्रमाणात त्याला स्वीकारण्याचा लिंग आधारीत भेदभाव भारतात नेहमी पाहायला मिळतो. स्त्री किंवा बालकांनी त्यांना आखून दिलेला 'नैतिकतेचा उंबरठा' ओलांडला की त्यांच्या बाबतीत अशा काही घटना घडतातच किंवा घडू शकतात असं आम्ही गृहीतच धरुन चाललेलो असतो. लोकप्रिय माध्यमांमधलं स्त्रियांचं प्रतिनिधीत्व आणि लोकप्रिय चित्रपटांमधला पिडित साचेबद्धपण हाही स्त्रिया आणि तरुण बालकींवरच्या लिंग आधारित हिंसेबद्दल समाजाला असंवेदनशील बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो.

- **बालकांपेक्षा मोठ्यांना महत्त्व देणारी आणि त्यांच्यावर विश्वास ठेवणारी संस्कृती**

बालकांकडं अजूनही पूर्णपणे विकसित झालेले नागरिक म्हणून पाहिलं जात नाही. ज्या विषयांचा बालकांवर थेट परिणाम होणार असतो त्यावरची त्यांची मतं आणि त्यांचाच आवाज यांना सार्वजनिक संवादांमध्ये फारसं स्थान नसतं. वडीलधाऱ्यांच्या मताबद्दल अगदी थोडासाही मतभेद व्यक्त न करता त्यांचा 'आदर' करण्याची शिकवण बालकांना दिली जाते. तरीही कुणी व्यक्त झालं तर ते वडिलधाऱ्यांचा 'अवमान' करणारं ठरवलं जातं. त्यामुळं लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या बालकावर सहसा कोणी विश्वास ठेवत नाही, वडिलधाऱ्याकडून त्याच्या/तिच्याबाबतीत असं काही घडू शकतं हेच कोणी खरं मानत नाही. लैंगिक अत्याचार झाले तर त्यात त्या 'बालकाचाच दोष' असं पालक आणि समाज मानतो.



- **बालक लैंगिक अत्याचाराच्या नोंदीचा परिणाम**

**1) अत्याचारग्रस्तावर दोषारोप**

स्त्री आणि बालकांवरच्या लैंगिक अत्याचारांच्या बहुतांश घटनांमध्ये समाज आणि प्रसारमाध्यमं अत्याचार ग्रस्तालाच दोषी धरतात, विशेषतः ते बालक जर मुलगी असेल तर बऱ्याचदा त्या बालकीनं स्वतःच तशी वेळ ओढवून घेतली यासारखी विरोधात जाणारी विधानं केली जातात. प्रत्यक्ष बळी कोण आणि अपराधी कोण यावरचा स्वस्छ दृष्टीकोन गमावला जातो. त्याऐवजी बाह्य गोष्टींवरच फार चर्चा होते जसं की त्या अत्याचारग्रस्ताच्या अंगावर कपडे कसे होते, ती बाहेर होती ती रात्रीची कोणती वेळ होती, तिच्या सोबत कोण होतं, लैंगिक कृत्याला तिची संमती होती का इत्यादी.

**2) अत्याचारग्रस्त आणि त्याच्या कुटुंबीयांना प्रत्यक्ष आणि संभाव्य धमकी**

लैंगिकतेवर बोलायचंच नाही या बंधनाची संस्कृती आपण लादून घेतो आणि जोडीला बळी पडलेल्या व्यक्तीलाच दोष देत बसतो तेव्हा हे अगदी उघड आहे की बहुतांश पिडीत तक्रार देण्यासाठीच पुढं येत नाहीत. समाज आपल्यावर कलंकित असल्याचा शिक्का मारेल अशी भीती त्यांना वाटते. एवढचं काय समाज पिडीत व्यक्तीचं चारित्र्य आणि तिच्या प्रतिष्ठेसंबंधी नैतिक प्रतिक्रीया व्यक्त करू लागतो, अपराधी माणूस जर महत्त्वाच्या सत्तापदावर असेल तर तो पिडीताला, पिडीताच्या कुटुंबाला धमकावू (कधी हिंसक तर कधी जीवघेण्या पद्धतीनं) शकतो. प्रत्यक्षात गुन्हा नोंदवला पिडित व तिच्या कुटुंबियांच्या प्रतिष्ठेला धक्का बसू शकतो. त्यांच्या विरोधात खोट्यानाट्या कंड्या पिकवून त्रास दिला जाऊ शकतो. ज्या संस्कृतीमध्ये पौरुषाचा अभिमान बाळगण्याची पद्धत असते त्या संस्कृतीमधल्या बालकग्यांवर लैंगिक अत्याचार झाले तर ते उघड केला तर समाज आपल्यावर 'बायल्या' असा शिक्का मारेल, अशीही धास्ती बालकग्यांमध्ये असू शकते.

लैंगिक अत्याचाराच्या अनेक घटनांमध्ये गुन्हेगार पिडीताचे आक्षेपार्ह फोटो किंवा व्हिडीओ काढतो. अत्याचाराची वाच्यता कुठे केली तर आक्षेपार्ह फोटो/व्हिडीओ इंटरनेटच्या माध्यमातून जगजाहीर करण्याची धमकी देत तो पिडीताला गप्प करतो आणि परतपरत अत्याचार करत राहतो. अशानं अत्याचाराचं दुष्टचक्र चालू राहतं.

## बालके अत्याचाराची वाच्यता का करत नाहीत याची सात कारणं

1. आपल्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही याची भीती वाटते.
2. आपल्यावर अत्याचार झाला यात आपलीच काहीतरी चूक असावी, असा अपराधभाव मनात असतो.
3. अत्याचारासंदर्भात जेव्हा कधी पिडीत व्यक्ती बोलते तेव्हा त्या धक्कादायक प्रसंगाची कटू आठवण होते आणि त्यामुळं ती प्रत्येकवेळी पुन्हा कोसळते; म्हणूनच बालकांना पुन्हापुन्हा अत्याचाराची ती आठवण नकोशी वाटते.
4. अत्याचार ज्यानं केला ती व्यक्ती आपल्याशी नातं तोडेल किंवा आपल्यामुळं ती अडचणीत येईल, याची भीती बालकांना वाटते. बालकांना चुकीच्या पद्धतीनं वाढवल्यानं किंवा गुन्हेगार कुटंबातलाच सदस्य असल्यास ही शक्यता जास्त असते.
5. आपल्यातलं नातं नैसर्गिक आहे यावर बालकाचा विश्वास बसेल, या पद्धतीनं गुन्हेगार बालकाच्या मनात भ्रम निर्माण करु शकतो. आपल्यावर अत्याचार होतोय, याचीच काहीवेळा बालकाला जाणीव होत नाही.
6. सूड घेतला जाण्याच्या किंवा अत्याचाराची पुनरावृत्ती होण्याच्या भीतीनं पिडीत बालक गप्प राहते.
7. सामान्यतः बालकांना त्यांच्या भावना मोकळेपणानं व्यक्त करण्याची संधीच दिली जात नाही आणि जेव्हा ते बोलतात तेव्हा मोठी माणसं ते ऐकत नाहीत किंवा त्यावर विश्वास ठेवत नाही.

* * *

प्रकरण २

# सर्वसमावेशक कायदा

## एक व्यापक कायदेशीर चौकट



पोक्सो हे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 15 (3) च्या अनुषंगानं आहे, ज्यात सरकारला बालकांसाठी विशेष तरतूद करण्याची परवानगी मिळते. 'पोक्सो' म्हणजे 2012 च्या 'लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण' याचा संक्षेप होय. या कायदाच्या अस्तित्वामुळं जो लैंगिक गुन्हेगारीला बळी पडणाऱ्या बालकांना केवळ न्यायच नव्हे तर त्या बालकांचे हित आणि कल्याण यांचे रक्षण करणारा सर्वात व्यापक कायदा भारताला मिळाला आहे. बाल संरक्षणाच्या दृष्टीनं या कायद्याची निर्मिती हा मैलाचा दगड आहे.

खरं तर 2012 पूर्वी, बालकांवरच्या लैंगिक अत्याचाराच्या विरोधातले कोणतेही विशिष्ट कायदे भारतात नव्हते. बालकांवरील लैंगिक अत्याचारांची नोंद भारतीय दंड संहिते (आयपीसी) अंतर्गत केली जायची. त्यामुळं जोवर थेट संभोग होत नाही तोवर बालकांना पोर्नोग्राफी दाखवणं यासारख्या अनेक लैंगिक अत्याचारांवर गुन्हे नोंदले जात नसत. बालकांवर लैंगिक अत्याचार करणाऱ्यांना न्यायालयात खेचता येईल अशा तरतुदी नव्हत्या.

या न्याय व्यवस्थेला सामोरं जाण्याचं खडतर आव्हान पीडित आणि कुटुंबांपुढं असायचं. गुन्हेगाराच्या वकिलाकडून पिडीत बालकाला कोर्टात विचारले जाणारे तिखट प्रश्न आणि त्या सगळ्याचं प्रसिद्धीमाध्यमांमधून वार्तांकन होण्याची शक्यता म्हणजे यात पिडित बालकाला पुन्हा एकदा त्या नरकयातना भोगायला लावण्याचाच धोका होता. न्याय व्यवस्थेतली क्लिष्टता आणि न्याय मिळण्यास होणारा विलंब यामुळं पीडित आणि कुटुंबिय थकून जात. एवढंच नव्हे तर केवळ कोर्टातून न्याय मिळाल्यानं पीडित बालकगा त्या धक्क्यातून सावरून पुढं जाईल याची खात्री नव्हती.

इतर आवश्यक पुनर्वसन आणि नुकसान भरुन काढणाऱ्या उपयांची उणीव होती. पीडितांसाठी न्याय व्यवस्था असंवेदनशील होती. पीडित बालकाला विचारले जाणारे निष्कर्ष काढणारे कठोर प्रश्न, घडून गेलेल्या कटू प्रसगांची त्याला वारंवार आठवण करुन देणं, आठवायला लावणं आणि एकूणच न्यायिक चौकशी म्हणजे पीडित बालकाला पुन्हा त्याच अत्याचाराच्या प्रसंगात ढकलणारी ठरत होती. न्यायदानातील विलंबामुळं पीडित बालकाचं आणि त्याच्या कुटुंबियांचं आयुष्य उध्वस्त होण्याची भीती होती. पुरावे देण्याचा सगळा भार पीडित बालकावर असायचा, अपराध्यावर नव्हे.

प्रत्यक्षात जितके गुन्हे घडले त्या तुलनेत नोंदल्या गेलेल्या प्रकरणांची संख्या फारच कमी होती. नोंदल्या गेलेल्या खटल्यांमधली पीडित बालकं चौकशी आणि सुनावणीदरम्यान कोसळून जायची. पुढं, त्या पीडितानं बोलण्याचं निश्चय केला तरी सामाजिक कलंकापासून सुटका करुन देणारी संस्थात्मक सुरक्षा त्यांना उपलब्ध नव्हती.



- **पोक्सो कायद्यातील महत्त्वाच्या तरतुदी**

1. पुरावे देण्याची जबाबदारी गुन्हेगारावर

   पोक्सो कायदा खास यासाठी ठरतो, की यात पीडित बालकावर पूर्ण विश्वास टाकण्यात आला आहे. उलट आरोपी निष्पाप असल्याचं सिद्ध करण्याची संपूर्ण जबाबदारी त्याचा/तिच्या वर ठेवण्यात आली आहे. अधिनियमातील कलम 29 मधल्या कलम 3, 5, 7 आणि 9 अनुसार कोणत्याही प्रकारचं गुन्हेगारी कृत्य किंवा उत्तेजन किंवा गुन्हा करण्याचा प्रयत्न करण्याबद्दल एखाद्या व्यक्तीवर कारवाईचा अधिकार आहे; जोपर्यंत वेगळं काही सिद्ध होत नाही तोवर संबंधित व्यक्तीनं गुन्हा केला आहे, गुन्ह्याचा प्रयत्न केला आहे, असंच विशेष न्यायालय गृहीत धरतं. गुन्हा घडला आहे हे सिद्ध करण्याचा दबाव पीडित बालकावर असता कामा नये याची खबरदारी कायद्यानं घेतली आहे. आरोपीची 'अपराधी मानसिक स्थिती' (हेतू, उद्देश इत्यादी) न्यायालय गृहीत धरतं. कलम 30 (1)

2. पोक्सो कायदा लिंग तटस्थता मानतो. अठरापेक्षा कमी वयाच्या मुलगा आणि मुलगी या दोघांच्या विरोधातील लैंगिक गुन्ह्याची दखल घेतली जाते.

3. लिंग आणि वय यात भेद न करता सर्व गुन्हेगारांच्या शिक्षेची तरतूद पोक्सो कायद्यात आहे.

4. गुन्हेगारीचं अंशांकन

   विस्तृत लैंगिक अत्याचारांची दखल पोक्सो कायद्यानं घेतली आहे. पूर्ण लिंग प्रवेश, अंशंत लिंग प्रवेश, लिंग प्रवेश रहित लैंगिक अत्याचार, बालकांना पोर्नोग्राफी दाखवणं, बालकांचा वापर पोर्नोग्राफीसाठी करणं, लैंगिक हेतूनं बालकांचं प्रदर्शन इत्यादी. शारीरिक आणि अशारीरिक संपर्काच्या सर्व अत्याचार प्रकारांपासून कायदा बालकांचं संरक्षण करतो.

5. संरक्षकच जर गुन्हेगार बनले तर अशांना कठोर शिक्षेची तरतूद

   विश्वास, अधिकार किंवा सत्तापदावर असलेल्या व्यक्तीनं उदाहरणार्थ पोलिस अधिकारी, संरक्षण दलातील सदस्य किंवा सरकारी नोकर इत्यादींनी (कलम 5 आणि 9) लैंगिक गुन्हा केला तर अशांविरोधात पोक्सो कायद्यात कठोर शिक्षेची तरतूद आहे.

6. बालस्नेही उपायांची तरतूद

लोक, व्यवस्था आणि कार्यपद्धती संवेदनशील असावी आणि बालकांच्या गरजांना प्रतिसाद देणारी असली पाहिजे, हे पोक्सो कायद्याला अपेक्षित आहे. उदाहरणार्थ लैंगिक गुन्ह्याची तक्रार देण्यासाठी बालकाला पोलिस ठाण्यात नेण्याची गरज नाही, असं कायदा स्पष्टपणे सांगतो. उलट पोलिसांनी स्वतः बालकाकडं जावं तेही पोलिसी गणवेशात नव्हे (कलम 24)

7. पीडित बालक आणि कुटुंबीयांना आधार

लैंगिक गुन्ह्याला सामोरं जाणं पीडित बालक आणि कुटुंबियांसाठी सोपं नसतं, याची दखल पोक्सो कायद्यानं घेतली आहे. त्यामुळे बालकाला मदत करण्यासाठी अनुभवी आणि व्यावसायिक व्यक्तींची नियुक्ती करण्याची तरतूद कायद्यात आहे. (कलम 39 आणि 40)



8. बाल संरक्षण ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी

बाल लैंगिक गुन्ह्याची तक्रार पोलिसांकडे देण्याची जबाबदारी पोक्सो कायद्याने प्रत्येक नागरिकाला बंधनकारक केली आहे. (कलम 19)

9. तक्रार देण्यात किंवा नोंदवण्यात चूक झाल्यास शिक्षा

बाल लैंगिक गुन्ह्याची तक्रार देण्यात किंवा ती नोंदवण्यास चूक झली तर तो दंडनीय गुन्हा आहे.

10. कोर्टालाही विशेष अधिकार नाही

पोस्को खटल्यांच्या सुनावणीत कोर्टाला त्यांच्या विवेकाधीन अथवा विशेष अधिकारांचा वापर करता येणार नाही. कायद्याने निश्चित केलेली किमान शिक्षा कमी करण्याचा अधिकार कोर्टाला नाही.

11. बालकाची आणि कुटुंबीयांची गोपनीयता

प्रसारमाध्यमांनी बालकाची ओळख आणि गोपनीयता सुरक्षित ठेवली पाहिजे. पीडित बालकाचे नाव, पत्ता, शेजार, शाळेचे नाव किंवा इतर तपशील या द्वारे बालकाची ओळख जाहीर करणे किंवा प्रसिद्ध करणे हा दंडनीय गुन्हा आहे ज्यात किमान सहा महिन्यांचा आणि कमाल एका वर्षाचा तुरुंगवास आणि आर्थिक दंड किंवा दोन्हीची तरतूद आहे. बालकाच्या प्रतिष्ठेला बाधा येणारे नकारात्मक वार्तांकन करण्यासही बंदी आहे. बालकाच्या हितासाठी काही गोष्टी खुल्या करण्यास विशेष न्यायालय परवानगी देऊ शकते. (कलम 23)

## माध्यमांसाठी मार्गदर्शिका

### करा...

- गुन्ह्याच्या स्वरुपाचे वर्णन करताना अचूक परिभाषा वापरा.
- या कायद्यानुसार लैंगिंक संमतीचा मुद्दा गैरलागू आहे.
- संस्था किंवा सत्तापदांवरील अधिकारी व्यक्तींना जबाबदार धरा.
- अत्याचारांच्या घटनांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परिणामांचा उल्लेख करा.
- पुनर्वसन, संरक्षण, बाल सल्लागार–वकील–मानसशास्त्रज्ञ आदी संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञ आदी खटल्याशी संबंधित इतर पैलूंवर लक्ष द्या. विश्वासार्ह संस्थांकडून तथ्य तपासून घ्या.
- संवाद साधण्यापुर्वी सहाय्यक, स्वयंसेवी संस्था किंवा पीडिताच्या–कुटुंबियांच्या परिचयातल्या व्यक्तीची मदत घ्या.
- पीडीत किंवा कुटुंबियांना प्रश्न विचारण्यापुर्वी (उपलब्ध असल्यास) केस फाईल किंवा एफआयआरची प्रत वाचा
- पीडिताशी बोलण्यापुर्वी त्याचा विश्वास ज्यावर आहे अशा प्रौढ व्यक्तीची–संस्थेची, पालकाची परवानगी घ्या.
- समाजात जागरुकता निर्माण करण्यासाठी गुन्हेगाराची कार्यशैली, पद्धत वर लक्ष केंद्रीत करा.
- विविध सामाजिक–आर्थिक दृष्टीकोनातून घटनेची मांडणी करा.

### टाळा...


- संभ्रम निर्माण करणाऱ्या किंवा कमीत कमी शब्दप्रयोगांची भाषा. उदाहरणार्थ –'बालकाबरोबर लैंगिक संबंध' किंवा 'अल्पवयीनासोबत संबंध'
- पीडितावर दोषारोप करणे. ती/तो दोषी नसून घडलेल्या गुन्ह्याचा दोष पूर्णतः अपराध्याचा आहे.
- दुर्वतन करणाऱ्यांकडे 'आरोप झालेले आरोपी' म्हणून पाहा.
- पीडित 'एकटाच' आहे असे गृहीत धरणे. असाच अनुभव आलेल्या अनेक इतरांच्यावतीनं बहुतेकदा एखादाच पुढं येत असतो.
- गुन्ह्याची तीव्रता कमी करणे, विनाशकारी ठरू शकणाऱ्या दुरगामी परिणामांकडं दुर्लक्ष करणं.

- फक्त पोलिस आणि न्याय व्यवस्थेच्याच भूमिकेवर लक्ष केंद्रीत करणं.
- पीडित आणि कुटुंबियांना प्रश्न घेऊन स्वतःहून एकटेच भेटणे.
- गुन्ह्यासंदर्भातले प्रश्न त्यांना थेट विचारणं किंवा एफआयआरला प्रसिद्धी देणं.
- पालकांच्या परवानगीविना पीडित बालकाशी संपर्क साधणं.
- केवळ लैंगिक गुन्ह्यावर लक्ष केंद्रित करणं. उदाहरणार्थ बलात्कार.
- गरीब आणि अशिक्षित समाजातल्या पालकत्वाची ही समस्या असल्याचा शिक्का मारणं.

## पीडित बालकाचा जबाब नोंदवून घेणं (कलम 24)

- **लक्षात ठेवण्याच्या नऊ गोष्टी**

1. गणवेशात नसलेल्या स्त्री पोलिसानं शक्यतो जबाब नोंदवून घ्यावा.
2. बालकाच्या घरी किंवा त्याला सोईचं वाटेल अशा ठिकाणी.
3. बालक जी भाषा बोलत असेल त्या भाषेत.
4. घटनेचं वर्णन करत असताना बालकाला पुरेसा निवांतपणा देणं.
5. पालक किंवा बालकाच्या विश्वासातील व्यक्तीच्या उपस्थितीत 24 तासात वैद्यकीय तपासणी.
6. विश्वासू प्रौढ आणि/किंवा तज्ज्ञ दुभाषी, अनुवादक, सामाजिक कार्यकर्ता यांच्या उपस्थितीत.
7. उपलब्ध असल्यास ऑडिओ-व्हिडीओ उपकरणांचा वापर.
8. नोंदवून घेतलेला जबाब पोलिस अधिकाऱ्यानं पीडित बालकाला मोठ्या आवाजात वाचून दाखवणं.
9. बालकाला/कुटुंबाला जबाबाची प्रत देणे आवश्यक.




- **भरपाई**

एफआयआर दाखल झाल्यापासून केव्हाही बालकाच्या पुनर्वसनाकरता किंवा त्याला आराम देऊ शकणाऱ्या तात्कालिक गरजांची पूर्तता करण्यासाठी विशेष न्यायालय भरपाई देण्याचा अंतरिम आदेश देऊ शकतं. या अंतरिम भरपाई आदेशाचं समायोजन अंतिम भरपाईमध्ये करता येईल. आरोपीवरचे दोष सिद्ध झाल्याच्या किंवा निर्दोष मुक्तता झाल्याच्या किंवा सुटका झाल्याच्या किंवा आरोपीचा तपास न लागल्याच्या किंवा आरोपीची ओळख न पटल्याच्या स्थितीतआणि गुन्ह्यामुळं बालकाला शारीरिक इजा झाल्याचे विशेष न्यायालयाचे मत झाल्याच्या स्थितीत विशेष न्यायालय भरपाईचा आदेश देऊ शकतं. (पोक्सो नियम 2012, नियम 7)

* * *

## प्रकरण - ३

# प्रमुख घटकांची भूमिका




---

### 1. पालकांची भूमिका

आई–वडिल हे बालकाचे पहिले गुरु असतात आणि काही धडे हे इतरांनी बालकांना देणं हे तितकसं सोपं नसतं. तुमच्या बालकाला देण्याच्या सर्वात महत्त्वाच्या आणि मौल्यवान धड्यांमधला एक असतो तो म्हणजे – बालकानं स्वतःचं शरीर जाणून घ्यायला हवं, समजून घ्यायला हवं. बालकाचं लिंग, शरीराच्या सर्व अवयवांची माहिती आणि त्यांची कार्यं इतक्याच जैविक अर्थापुरतं शरीरज्ञान मर्यादीत राहता कामा नये. त्याचबरोबर नात्यांमधल्या मर्यादा सांभाळण्याचं भान, नाती हाताळण्याची हातोटी या बद्दलची समजसुद्धा बालकाला द्यायला हवी.

- **शरीरातल्या अवयवांची अचूक नावं बालकाला शिकवा.**

शरीर आणि संबंधित सुरक्षेच्या दृष्टीनंपुढील सर्व संभाषणांसाठीची ही तार्किक सुरुवात आहे. बहुतेक पालक शरीराच्या काही भागांची विशेषत:जननेंद्रिय, स्तन आणि नितंब आदींची त्यांच्या योग्य जैविक नावांनी ओळख करुन देण्याऐवजी अस्पष्ट, सौम्य किंवा बालिश नावांचा वापर करण्यास प्राधान्य देतात. हे म्हणजे सफरचंदला 'हत्ती' म्हणण्यासारखं झालं. खरं तर योग्य माहितीयोग्य वयातच बालकाला दिली जाऊ शकते. संबंधित अवयवांचा लैंगिक वापर बाजूला सारल्यास त्यांची ओळख करुन देण्याचं काम सोपं होतं, हे आपल्या लक्षात येईल.

बालकांना शिकवताना आत्मविश्वासानं सांगा, की लघवी करण्यासाठी शिश्न असतं. नितंब ही एक अशी महत्वाची उशी आहे, ज्याच्या शिवाय आपण बसू बसू शकणार नाही. स्तन बाळाची भूक भागवण्यासाठी असतात. इतर अवयवांची ओळख ज्या पद्धतीनं करुन देता त्याच पद्धतीनं या अवयवांबद्दलही बोला. उदाहरणार्थ वस्तु उचलण्यासाठी–हाताळण्यासाठी हात, चालण्यासाठी पाय इत्यादी.अनावश्यक लज्जा एकदा का तुम्ही दूर सारुन बोलायला सुरुवात केली की मग त्यावरच भविष्यातला मोकळा संवाद उभा राहतो. तुम्ही तुमच्या बालकाचा विश्वास आणि आदर कमवता. तुमच्या माहितीवर तुमची बालकं किती सकारात्मक प्रतिसाद देतात हे पाहून आपल्याला आश्चर्य वाटेल.

- **बालकाच्या वर्तनातील इशारा देणाऱ्या खुणा**
  - बालकाला दचकवणारी स्वप्न पडू लागतात, झोपेची समस्या उद्भवते.
  - काहीवेळा बालक विचलित होतं किंवा दुरावा निर्माण होतो.
  - खाण्याच्या सवयींमध्ये बदल, खायला नकार देतं किंवा भूक लक्षणीयरित्या कमी होते.
  - लैंगिक किंवा भीतीदायक प्रतिमांचंलेखन, चित्रण किंवा स्वप्नं पडतात.
  - काही लोक किंवा स्थळांबद्दल अचानकपणे भीती उत्पन्न होते.
  - अकारण हातात पैसे, खेळणी किंवा इतर भेटवस्तू दिसू लागतात.
  - स्वतः किंवा स्वतःचं शरीर गलिच्छ, वाईट असल्याचं वाटू लागतं.
  - प्रौढांप्रमाणे लैंगिक वर्तन, भाषा आणि माहिती बालकात दिसते.
  - स्वतःला इजा करुन घेणे (कापणे, भाजणे).
  - अपुरी व्यक्तीगत शारीरीक स्वच्छता.
  - नशेचे पदार्थ, मद्याचा वापर.
  - आत्महत्येचा प्रयत्न
  - जवळीकतेची धास्ती
  - खूप खाणं किंवा उपाशी राहणं



- **मर्यादांची जाणीव बालकाला करुन द्या**

मर्यादांची जाणीव करुन देताना अनेक पालक फक्त गुप्तांगांबद्दलच बोलतात. पालक म्हणून तुम्ही बालकाला हे सांगितलं पाहिजे, की तुझ्या शरीरावर पूर्णतः फक्त तुझाच हक्क आहे. व्यक्तीगत स्वातंत्र्यावर भर हवा, केवळ गुप्तांगांवर नव्हे. कोणत्याही मोठ्या व्यक्तीला किंवा तुझ्यापेक्षा ताकदवान व्यक्तीला जननेंद्रीयांना स्पर्श करण्याचा हक्क नाही किंवा त्यांच्या जननेंद्रियांना तुला स्पर्श करायला लावण्याचा हक्क नाही किंवा तुझ्या जननेंद्रियांचे फोटो–व्हिडीओ काढण्याचा हक्क नाही हे सांगितलं पाहिजे. तुझं शरीर तुझंच आहे, तुझ्या शरीराला कोणी स्पर्श करायचा किंवा नाही, हे ठरवण्याचा अधिकार तुझाच आहे, हे बालकाला सांगितलं पाहिजे. हात हातात घेणं, मिठी मारणं यालाही नकार देण्याचा अधिकार तुला आहे, हे बालकाला सांगितलं पाहिजे. कुटुंबात वावरतानाही खासगीपणाचे नियम काटेकोरपणाने पाळा, कुटुंबातल्या सर्व सदस्यांशी त्याबाबत बोला. शरीरासंदर्भातल्या मर्यादा या वयानुरुप असतात आणि त्या वयानुसार बदलत जातात, हेही लक्षात ठेवा.

- **स्पर्शांचे प्रकार**

सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्श, संभ्रम निर्माण करणारा स्पर्श कुठला हे ओळखायला बालकाला शिकवा. आईनं बालकाला जवळ घेणं हे अगदी सुरक्षित आहे. विशिष्ट स्पर्श अगदी असुरक्षित असतात जसं, की चुंबन, गुप्तांगाना स्पर्श, मिठी इत्यादी. संभ्रमीत स्पर्श तो असतो जेव्हा बालकाला नेमकेपणानं कळत नाही.

- **'नाही' म्हणायला शिकवा**

मोठी माणसं काय सांगतात किंवा काय शिकवतात त्याचं अनुकरण करायला आपण बालकांना सांगतो. पण सगळीच मोठी माणसं विश्वासार्ह नसतात. त्यामुळं बालकाला 'नाही' म्हणायला शिकवा. तुम्हाला गैरसोईच्या वाटणाऱ्या पद्धतीनं कोणी तुम्हाला स्पर्श करु पाहात असेल तर, किंवा इतरांच्या अवयवांना तुम्हाला स्पर्श करण्यास सांगत असेल किंवा फोटो घेत असेल तर 'नाही' म्हणा. त्रासदायक, अडचणीच्या प्रसंगापासून ताबडतोब दूर जा आणि विश्वासातल्या व्यक्तीला घडल्या प्रकाराची माहिती द्या, हेही बालकाला शिकवा. बालक तुम्हाला जे काही सांगतं त्याच्यावर विश्वास ठेवा. लैंगिक अत्याचाराबद्दल जेव्हा बालक सांगतं तेव्हा ते शांतपणे ऐकून घ्या.

## पालकांसाठी महत्त्वाचे

**लैंगिक अत्याचार समजल्यानंतर बालकाबरोबरचं वर्तन**

| करा... | टाळा... |
|---|---|
| बालकाच्या बोलण्याकडं लक्ष द्या, त्याच्या बोलण्यावर नाराज विश्वास ठेवा | गुदरलेल्या प्रसंगाबद्दल बालकांनं सांगितल्यानंतर होणं, बालकांकडं दुर्लक्ष करणं, बालकाला दोष देणं |
| तुझ्यावर माझं प्रेम आहे, मी तुझं रक्षण करीन, घडलं त्यात तुझी चूक नाही हे त्याला/तिला सांगा. | जे घडलं ते विसरून जा, बालकाला दोष देणं किंवा झालेल्या अत्याचारा बद्दल बालकाला गप्प बसायला सांगणं |
| काही वेळापुर्वीच अत्याचार झाला असेल तर बालकाला बालकाला तातडीनं वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात न्या जेणेकरुन पुरावे नष्ट होणार नाहीत. | काही वेळापुर्वीच अत्याचार झाला असेल तर आंघोळ घालणं. त्याचे कपडे आणि इतर महत्त्वाचे पुरावे फेकून देणं. |
| तिच्या/त्याच्या मानसिक आरोग्यासाठी समुपदेशक किंवा तज्ज्ञ स्वयंसेवी संस्थेचं मार्गदर्शन घेणं. तुम्हाला स्वतःला धक्का बसला असेल तर मदत घेणं. | बालकावर झालेला आघात किंवा त्याच्या मानसिक आरोग्याकडं दुर्लक्ष करणं. स्वतःच्या मानसिक स्थितीकडं दुर्लक्ष करुन बालकाकडं लक्ष देणं. |

## एफआयआर नोंदवणे

| करा ... | टाळा... |
|---|---|
| घटनेची तक्रार देण्यासाठी नजीकच्या पोलिस ठाण्यात जा. | बालकाला पोलिस ठाण्यात घेऊन जाणे. |
| सर्व तपशील लिहून घेऊन एफआयआरची प्रत देण्यास पोलिसांना सांगा. | पोलिसांबरोबरच्या तोंडी संवादावर अवलंबून राहणे. |
| एफआयआर नोंदवल्यानंतर वैद्यकीय तपासणी होताना बालकाची सोबत करणे. | बालकाला पोलिसांबरोबर किंवा इतर व्यक्तीबरोबर एकट्याला पाठवणे. |
| जबाब देण्यासाठी बालकाला तयार करणं. बालक अस्वस्थअसेल तर जबाब नोंदवताना तुम्ही सोबत उपस्थित राहणं. | जबाब नोंदवताना बालकाला पोलिसांसोबत एकटं सोडणं. (बालकाची तशी मागणी असल्याखेरीज) |

### याची खात्री करा...

* जबाब घेण्यासाठी पोलिस कधी येणार आहेत याची त्यांची आगावू वर्दी दिली आहे का?
* जबाब तुमच्या घरी किंवा बालकाला जिथं सुरक्षित वाटेल अशाच ठिकाणी नोंदवला गेला पाहिजे.
* जबाब घेण्यासाठी पोलिसांनी गणवेशात येता कामा नये.
* उप-निरिक्षक किंवा त्यापेक्षा वरीष्ठ दर्जाच्या महिला पोलिस अधिकाऱ्यानेच जबाब नोंदवून घ्यायसा हवा.
* लिहून घेतलेला, टंकलिखीत केलेला जबाब बालक बोललं तसाच असला पाहिजे.
* विशेष किंवा दिव्यांग बालक असेल तर विशेष तज्ज्ञांचे सहकार्य पोलिसांना मागा.
* जबाब पूर्ण झाल्यानंतर तुम्ही आणि बालकापुढं पोलिसांना तो मोठ्या आवाजात वाचायला लावा. त्यात बदल, सुधारणा असल्यास पोलिसांना सांगा.
* जबाबाची प्रत पोलिसांकडून घ्या. तपास अधिकाऱ्याची माहिती नोंदवून घ्या.

## वैद्यकीय तपासणी

| करा... | टाळा... |
|---|---|
| वैद्यकीय तपासणी करण्यास सक्षम तपास अधिकाऱ्याकडून डॉक्टरांनी अनुमती घेणे. (कलम 164 सीआरपीसी 1973) | तपास अधिकाऱ्याकडून अनुमती न घेता डॉक्टरांना वैद्यकीय तपासणी करु देणे. |
| बालकाच्या पालकांच्या किंवा बालकाच्या विश्वासू उपस्थितीत वैद्यकीय तपासणी होणे.(कलम2(3)) कोणत्याही स्थितीत बालकावर वैद्यकीय तपासणी लादणे. | बालकाच्या अनुमतीशिवाय डॉक्टरांना वैद्यकीय प्रौढाच्या तपासणी सुरु करु देणे. |
| पीडित मुलगी असेल तर वैद्यकीय तपासणी स्त्री डॉक्टरांनीच केली पाहिजे. (कलम 27 (2)) | डॉक्टरांच्या हाताळणीबाबत बालक असमाधानी असेल तरी वैद्यकीय तपासणी तशीच चालू ठेवणं. |
| मागील घटनांची नोंद घेतली जात असताना आणि वैद्यकीय तपासणी पूर्ण होईपर्यंत बालकासोबत राहणं<br><br>सर्व वैद्यकीय अहवाल आणि वैद्यकीय प्रमाणपत्र यांची प्रत घेणं. | बालकाला अडचण वाटत असताना उपस्थितीचा आग्रह धरणं.<br><br>वैद्यकीय अहवाल आणि वैद्यकीय प्रमाणपत्र घेण्यासाठी पैसे देणं. |

## गुन्ह्याचे घटनास्थळ आणि आरोपीची ओळख

| करा... | टाळा... |
|---|---|
| कारवाईच्या तारखा जाणून घेण्यासाठी तपास अधिकाऱ्याच्या संपर्कात राहणे. या सर्व कारवाई दरम्यान बालकासोबत राहणे. | गुन्ह्याच्या घटनास्थळी किंवा आरोपीची ओळख पटवण्यासाठी बालकाला एकटं जाऊ देऊ नये. |
| आरोपी किंवा तिच्या/त्याच्या नातेवाईकाकडून, आरोपीच्या हितचिंतकांकडून धमक्या आल्यास जवळच्या पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा(एनसी) नोंदवणे आणि या तक्रारीची प्रत पोलिसांकडून विनामूल्य घेणे. | आरोपी किंवा तिच्या/त्याच्या नातेवाईकाकडून येणाऱ्या धमक्यांकडं किंवा दबावाकडं दुर्लक्ष करणं. |
| तक्रार नोंदवल्यानंतर बालक आणि आरोपी एकमेकांच्या संपर्कात येणार नाहीत याची खबरदारी घेणं. | बालकाला आणि तुम्हाला आरोपीसोबत एकाच वाहनातून पोलिसांना रुग्णालय किंवा कोर्टात घेऊन जाऊ देणं. |

## कोर्टापुढे जबाब आणि पुरावा देणे

| करा... | टाळा... |
|---|---|
| न्यायालयीन प्रक्रियेच्या सर्व तारखा पोलिसांकडून तुम्हाला आगावू कळतील हे पाहा. तक्रार नोंदवल्या पासून पोलिसांनी 90 दिवसात कोर्टात दोषारोपपत्र सादर केले आहे अथवा नाही, हे पाहा. | पुरावे गोळा केल्यानंतर आणि जबबा दिल्यानंतर पोलिस अधिकाऱ्यांशी असलेला संपर्क तोडून टाकणे. |
| दंडाधिकाऱ्यासमोर तुमच्या बालकाच्या जबाबाचे ध्वनीमुद्रण केले जाताना उपस्थित राहा. | कोर्टाने सांगितल्याशिवाय न्यायालयातून बाहेर पडणे. तुमच्या सोबतीमुळं बालकाला धीर मिळणार असेल तर तुम्ही तशी परवानगी न्यायाधिशांकडं मागू शकता. |
| आरोपीच्या वकीलाकडून बालकाला थेट प्रश्न विचारले जाणार नाहीत, न्यायाधिशामार्फतच प्रश्न विचारले जावेत आणि न्यायाधिशच प्रश्न विचारत आहेत याची खात्री तुमचे वकील आणि/किंवा विशेष सरकारी वकील यांच्याकडून करुन घ्या. | आरोपीच्या वकीलाला आणि त्याच्या सल्लागाराला तुमच्या बालकाला प्रश्न विचारू देणं. |
| सुनावणीची गुप्तता आणि गोपनियता जपण्याची पुरेशी खबरदारी पोलिस आणि दंडाधिकाऱ्यांनी घेतली आहे, याची खातरजमा करा. | आरोपीसमोर बालकाला आणणं किंवा खटल्याचा तपशील खुल्या कोर्टात उघड करणं. |

## बालकाला भरपाई आणि पुनर्वसन

| करा... | टाळा... |
|---|---|
| तपास अधिकारी, स्थानिक स्वयंसेवी संस्था किंवा वकील यांच्याकडून बालकासाठीच्या भरपाई योजनेबद्दल माहिती घ्या. | बालकाला भरपाई आपसूक मिळेल किंवा मिळणारच नाही, हे गृहीत धरणं. |
| आघातातून बालकाला बाहेर काढण्यासाठी समुपदेशन चालू ठेवण. | अचानकपणे समुपदेशन बंद करणं. |
| अत्याचाराच्या घटनेनंतर बालकाची नेहमीची दिनचर्या शक्य तितक्या लवकर पूर्ववत होईल याची काळजी घ्या. | घटनेनंतर विनाकारण बालकाला शाळेतून बाहेर काढणं किंवा समाजापासून तोडणं. |

| | |
|---|---|
| बालकाशी सतत बोलत राहा. तुमचं तिच्या/त्याच्या वर प्रेम आहे आणि कुठल्याही प्रसंगात संरक्षण करण्यासाठी तुम्ही सोबत आहात असा विश्वास तिच्या/त्याच्या मनात निर्माण करा. | बालकाची दिनचर्या पुर्ववत सुरु झाली आहे, असं तुम्हाला वाटल्यानंतर बालकाच्या गरजांकडं दुर्लक्ष करणं. |

## विशेष अल्पवयीन पोलिस दलांची भूमिका

बालकांच्या संरक्षणात पोलीस महत्वाची भूमिका बजावतात. पोक्सो कायदा, 2012 बाल लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणांशी निगडीत असताना बालकांना बाल–मैत्रीपूर्ण प्रक्रिया अवलंबण्याची आज्ञा देतो.

बाल लैंगिक अत्याचाराचा अहवाल मिळविण्यासाठी पोलिसांनी घ्यावयाच्या पायऱ्या पुढील परिच्छेदात दिल्या आहेत.

या संदर्भात कारवाई करण्याच्या विविध प्रक्रियांबद्दलपोलिस ठाणं सजग असेल तर खटल्याच्या निपटाऱ्यासाठी विलंब होणार नाही. त्याचबरोबरतपास–सुनावणी या दरम्यान बालकाला दुसऱ्यांना यातना सोसाव्या लागत नाहीत.

तपास अधिकारी आणि संबंधित पोलिसांनी त्यांचे नाव, पद, पत्ता, दूरध्वनी–मोबाईल क्रमांक याच बरोबर त्यांच्या वरीष्ठांचे नाव, पद, पत्ता, मोबाईल क्रमांक ही माहिती पीडित बालक आणि त्याच्या कुटुंबियांना दिली पाहिजे.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण (डीएलएसए) कडून त्यांच्या संपर्कासाठीचा तपशील, बालकाला सर्व ती कायदेशीर मदत आणि वकील उपलब्ध करुन घेण्याचा अधिकार बालकाला आहे. पोक्सो कायदा, 2012 कलम 40 आणि नियम 4 (2)

- खासगी आणि सरकारी आरोग्य सेवा आणि संकटकालीन उपायांची उपलब्धता बालकाला करुन देणं.
- खटल्याच्या सर्व प्रक्रियांची माहिती देणं.
- तपास कुठवरं आला याची माहिती देणं.
- आरोपीची अटक, त्यांच्या जामीनाची स्थिती याबद्दल अवगत करणं.
- दोषारोपपत्र सादर करणं
- कोर्टातल्या प्रक्रियेची तारीख, वेळ, ठिकाण आदी सविस्तर माहिती देणं.
- न्यायाधिशांनी व्यक्त केलेली मतं आणि त्यांचा अर्थ सांगणं.
- भरपाई मिळवून देण्याची व्यवस्था करणं.

## पोलिसांसाठी महत्त्वाचे

### तक्रारीची नोंद करताना

| करा... | टाळा... |
|---|---|
| बालकांवरील लैंगिक अत्याचाराची प्रत्येक तक्रार नोंदवून घ्यावी. | कोणत्याही कारणावरुन तक्रार नोंदवून घेण्यास नकार देणं. |
| बालक आणि त्याच्या कुटुंबियांवर विश्वास दाखवा. बालकाचा धर्म, वर्ण, जात, लिंग किंवा जन्माचं ठिकाण अशा कोणत्याही मुद्यावरुन भेदभाव न करता संवेदनशील राहा. | बालक किंवा त्याच्या कुटुंबियांबद्दल साशंक राहून निर्णय करणं टाळा. अत्याचाराच्या घटनेबद्दल बालकाला किंवा त्याच्या कुटंबियांनाच दोषी धरणं. |
| तक्रारदाराकडून तपशीलवार, सविस्तर तक्रार नोंदवून घ्या. | तक्रार नोंदवण्यापुर्वीच बालकाकडून माहिती काढण किंवा त्याच्याशी बोलणं. |
| तक्रारीला आवक क्रमांक द्या, माहिती देणाऱ्याला तक्रार वाचून दाखवा आणि पोलिस दलाच्या रितसर तक्रार वहीत (रेकॉर्ड) ती नोंदवून घ्या. | विशेष नोंद न करता, आवक क्रमांक न देता मोघमपणे तक्रार लिहून घेणं. |
| बालक स्वतःच तक्रारदार असेल तर त्याची तक्रार त्याला/तिला समजेल अशा सोप्या भाषेत लिहून घ्या. | बालकाला न समजणाऱ्या कायदेशीर भाषेत किंवा शब्दच्छल करणाऱ्या भाषेत तक्रार लिहिणं. |
| बालकाची भाषा समजत नसेल किंवा त्याच्याशी संवाद साधण्यात अडचण येत असेल तर स्थानिक स्वयंसेवी संस्था किंवा तज्ज्ञाची मदत घ्या. | तुमची भाषा बालकाला समजत नसतानाही, त्याला विशिष्ट मदतीची गरज असतानाही स्वतःच रेटून तक्रार लिहून घेणं. |

**बालकाचं संरक्षण**

| करावे | टाळावे |
|---|---|
| बालकाची देखभाल, संरक्षण आणि आरोग्यविषयक गरजा भागवण्याची सोय तातडीनं करणं, आवश्यकतेनुसार निवारा गृहाची व्यवस्था करणं. | बालकाच्या देखभाल–संरक्षणाकडं दुर्लक्ष करणं. |
| बालकाची तक्रार आल्यापासून 24 तासाच्या आत स्थानिक बाल कल्याण समितीला त्या संदर्भात अवगत करुन देणं. | बालकाच्या देखभाल–संरक्षणाची काळजी घेण्याबाबत महत्त्वाची भूमिका निभावणाऱ्या बाल कल्याण समितीला दाखल तक्रारीची माहिती न देणं. |
| विनामूल्य कायदेशीर सहाय्य आणि जिल्ह्यातील इतर आधार सेवांची माहिती बालकाला आणि कुटुंबियांना देणं. | न्यायालयीन कार्यवाहीची माहिती आणि इतर उपलब्ध सेवांची माहिती बालकाला असेल असं गृहीत धरणं. |

**याची खात्री करा...**

- **पोलिसांनी गणवेशात बालकासमोर न जाण्याची काळजी घ्यावी.**
- **माता–पिता किंवा पालकांना जबाब नोंदवण्याच्या तारखेची आगावू माहिती द्यावी.**
- **महिला पोलिस अधिकाऱ्यानेच पीडित बालकाचा त्याच्या बोली भाषेत, त्याच्या कलाने जबाब नोंदवावा.**

## वैद्यकीय अधिकाऱ्यांची भूमिका

लैंगिक गुन्हेगारीच्या अनेक प्रकरणांमध्ये पालक किंवा बालकांचे त्यांचे काळजीवाहक बालकांना पोलिसांकडं घेऊन जाण्याआधी अगदी जवळच्या रुग्णालयात किंवा दवाखान्यात घेऊन जाण्यास प्राधान्य देतात. बालकाच्या जलद शारीरिक आणि मानसिक पुनर्वसनामध्ये आरोग्यव्यावसायिक आणि रुग्णालयाची भूमिका महत्वाची असते. लैंगिक अत्याचार करणाऱ्या व्यक्तीचे पुरावे वैद्यकीय तपासणीमध्ये पीओसीएसओच्या बहुतेक प्रकरणांमध्ये आढळतात.

लैंगिक अपराध नियम, 2012 मधील बालकांच्या संरक्षणाचा नियम 5 अन्वये कोणतीही वैद्यकीय सुविधा मग

ती खाजगी किंवा सार्वजनिक असली तरी तत्परतेनं पीडिताला उपलब्ध करुन देणं आवश्यक आहे. लैंगिक अत्याचार म्हणजे वैद्यकीय आणीबाणी आहे.


## वैद्यकीय व्यावसायिकांसाठीची कार्यपद्धत

**लैंगिक अत्याचार झालेल्या बालकाच्या वैद्यकीय तपासणी प्रक्रियेचा आढावा.**

- बालक/पालक/कुटुंबियांची संमती घ्या
- प्रथमोपचार द्या.
- सविस्तर पुर्वेतिहास जाणून घ्या.
- तपासणी वयाचे अनुमान - शारीरिक, दंतक, रेडिऑलॉजिकल
- पुरावे गोळा करणं योग्य त्या काळजीसह पॅक आणि सील करुन पोलिसांना सुपूर्त करणं.
- पुराव्यांचं दस्तऐवजीकरण
- उपचार इजा-जखमांवर इलाज
- संसर्गजन्य लैंगिक रोगांची चाचणी
- एचआयव्ही एड्स चाचणी
- संकटकालीन आरोग्य सेवा
- बालकींच्या बाबतीत गर्भधारणा चाचणी
- युपीटी (आवश्यक असल्यास)
- समुपदेशन
- इतर आवश्यक सेवांची माहिती आणि संदर्भ
- बालकाला घरी सोडणं
- प्रकृतीचा आढावा



# वैद्यकीय व्यावसायिकांसाठीची कार्यपद्धत



प्रौढांची वैद्यकीय तपासणी करण्याचे नियम आणि तत्त्वं बालकांनाही लागू होतात; काही अधिकच्या विशिष्ट मार्गदर्शक तत्वांचं पालन करणंही महत्त्वाचं असतं.

1. 12 वर्ष वयाच्या आतल्या बालकाच्या परीक्षणासाठी मातापिता किंवा पालकांची संमतीआवश्यक आहे.

2. बालकांना वैद्यकीय उपचारांसाठी आणताना गुन्हेगार सोबत असू शकतो, म्हणूनच जागरुक राहून तपासणी करा. अशा परिस्थितीत रुग्णालय/संस्थेच्याप्रमुखांनी नेमलेल्या महिला व्यक्तीस परीक्षणा दरम्यान उपस्थित राहण्यास सांगितलं पाहिजे.

3. बालक तरुण आहे म्हणून तो/तीसगळा घटनाक्रम व्यवस्थित सांगेल, असं गृहीत नका. बाहुल्या आणि 'बॉडी चार्ट्स' वापरुन पुर्वीच्या गोष्टी जाणून घेता येतील.

4. बालकं स्वतः काय सांगतात यावर विश्वास ठएवा. बालकं खोटं बोलतातकिंवा इतरांविरोधात खोटी तक्रार देण्यासाठी पालकांनी पढवल्याप्रमाणेच तो बोलतात या गैरसमजुती आहेत. बाल–लैंगिक अत्याचारांची तपासणी करताना अशा मिथकांना बळी पडू नका.

5. लैंगिक अत्याचारातून वाचलेल्या बालकांची विशेष काळजी घेण्याची गरज असते हे नेहमी लक्षात ठेवा.

6. डॉक्टरांनी पुढील गोष्टींची काळजी घ्यावी. बालकांना बोलतं करण्यासाठी त्यांना गोपनीयतेची खात्री पटवून देणं महत्त्वाचं ठरतं. जननेंद्रिय आणि गुदा परीक्षण नेहमीच्या यांत्रिकतेनं किंवा सरधोपटपणे करु नये. नियमित चौकशी करताना काही दिशादर्शक मुद्दे ध्यानात ठेवावेत –

- वेदना, लघवी होणं/ किंवा तपासणी टाळण्याकडं कल.
- ओटीपोटात दुखणं/अंगदुखी
- झोप न लागणं
- चिंता, घबराट, असहाय्य असल्याची भावना
- वजन कमी होणं
- एखाद्याचं आयुष्य संपवण्याची भावना




### 4. बाल कल्याण समिती (सीडब्ल्यूसी) ची भूमिका

लैंगिक अत्याचार झालेल्या पीडिताच्या देखभालीची आणि संरक्षणाची काळजी बाल कल्याण समिती घेते. ( जे कायदा, कलम 30, 2015)

स्थानिक पोलिस किंवा एसजेपीयू यांच्याकडून बाल लैंगिक अत्याचाराची तक्रार दाखल झाल्यानंतर तीन दिवसाच्या आत पीडित बालकाला कुटुंबियांकडं ठेवायचं, घरात ठेवायचं की बाल गृहात दाखल करायचं याचा निर्णय सीडब्ल्यूसीनं करायचा असतो. जेजे कायदा 2015, पोक्सो नियम, 2012 (नियम 4 (4)

- **बाल कल्याण समितीसाठी महत्त्वाचे :**

| करा... | टाळा... |
|---|---|
| पोक्सो कायद्याअंतर्गत पोलिसांनी नोंदवलेल्या प्रत्येक तक्रारीची दखल घ्या. | पोक्सो कायद्याअंतर्गत तक्रार दाखल झाल्यानंतरही पीडिताला भेटण्याचा किंवा प्रत्येक बालकाला सीडब्ल्यूसीपुढं हजर करण्याचा आग्रह धरणं. |
| बालकाचा जबाब नोंदवून घेण्यापुर्वी बालकानं दिलेली माहिती आणि उपलब्ध तपशीलाचं काळजीपूर्वक वाचन करावं. | सीडब्ल्यूसीच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक पीडित बालकाचा जबाब नोंदवून घेणं. |
| पीडिताला कुटुंबाच्या ताब्यातच ठेवायचं की बाल गृहात किंवा निवारा गृहात पाठवायंच याचा निर्णय तीन दिवसांच्या आता सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीनं किंवा सीडब्ल्यूसीनं स्वतः घ्यावा. | सामाजिक तपासणीच्या उद्देशानं रितसर आदेश देण्याऐवजी बाहेरच्या संस्थेकडून घर तपासणीचा अहवाल मागणं. |
| पीडिताच्या घरात किंवा समाजाताच त्याच्या दीर्घकालीन पुनर्वसनाचं नियोजन करणं | कुटुंबात किंवा समाजात ठेवण्यामध्ये मोठा धोका असल्याखेरीज बालकाला एखाद्या संस्थेत दाखल करणं |

चौकशी आणि सुनावणी दरम्यान बालकाला आधार देणाऱ्या स्वयंसेवी संस्था–व्यक्तीची नेमणूक करण्यासाठी संबंधितांना रितसर पत्र द्यावं. बालकासंबंधी चालू असलेल्या तपास आणि न्यायालयीन कार्यवाहीची माहिती नियमिपणे लेखी स्वरुपात सादर करण्यास सांगावे. स्वयंसेवी संस्था–व्यक्ती बालकाच्या हिताच्या दृष्टीनं आवश्यक कर्तव्यं समाधानकारकरित्या बजावत नसेल तर त्यांची सेवा खंडीत करावी. पोक्सो कायद्यातील बालकांना मदत करु शकणाऱ्या स्त्रोतांची यादी जिल्हा बाल संरक्षण दल, स्वयंसेवी संस्था, विशेष शिक्षक, अनुवादक, तज्ज्ञ यांच्याकडून स्वयंसेवी संस्था–व्यक्तींनी मिळवावी. तपास योग्य दिशेनं होत नसल्याचे वाटल्यास तपास अधिकाऱ्याला बोलावून माहिती घ्यावी.

## 5. स्वयंसेवी संस्था– आधार देणाऱ्या व्यक्तींची भूमिका

गैरसरकारी–स्वयंसेवी संस्था (एनजीओ), सामाजिक कार्यकर्ते, विशेष शिक्षक, सल्लागार आणि इतर तज्ज्ञांना सुनावणी आणि दीर्घकालीन पुनर्वसनासाठी तक्रार दाखल केल्यापासूनसंपूर्ण प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत पीडित आणि कुटुंबांला आधार देण्याचा कायदेशीर अधिकार पोक्सो कायदा देतो.

एनजीओ, आधार देणारी व्यक्ती,तज्ज्ञ, विशेष शिक्षक (नियम 2 (सीडीएफ आणि पोक्सो नियम, 2012 च्या अंतर्गत सांगितल्यानुसार किंवा दुभाषी आणि अनुवादकाची भूमिका बजावू शकतात. बालकाच्या संवाद पद्धतीशी परिचित असलेली व्यक्ती किंवा कोणाची उपस्थिती बालकाशी संवाद साधण्यासाठी उपयुक्त आहे हे नियम नियम 2 (ए) अंतर्गत सांगण्यात आले आहे.)

**बालकांवरील लैंगिक अत्याचाराच्या बाबतीत आधार देणारी व्यक्ती दुहेरी भूमिका निभावते –**

- संपूर्ण कायदेशीर प्रक्रिये दरम्यान – तपासणीपासून सुनावणीपर्यंत; आणि
- बालकाचे दीर्घकालीन पुनर्वसन आणि सुस्थिती निश्चित करण्यापर्यंत

**पुढील टप्प्यात आधार देणारी व्यक्ती सहभाग देते :**

अ : तक्रारीनोंदणीच्या वेळी (पालक संपर्क साधू शकतात किंवा बाल कल्याण समिती (सीडब्ल्यूसी) मदत करण्याची सूचना करु शकते.)

ब : तक्रार नोंदवल्यानंतर सीडब्ल्यूसीच्या अखत्यारीत आल्यापासून.

- **आधार देणाऱ्या स्वयंसेवी संस्था–व्यक्तींसाठी महत्त्वाचे :**
- एखाद्या प्रकरणात पीडीत–कुटुंबाला आधार देण्याची भूमिका निभावायची असल्याबाबत स्थानिक सीडब्ल्यूसीकडून लेखी पत्र घ्या. त्याची प्रत सदैव सोबत बाळगा.
- तुमची नियुक्ती झाल्याची माहिती विशेष न्यायालयाला 24 तासात देण्यासंदर्भात स्थानिक पोलिस किंवा एसजेपीयूना कळवा.पोक्सो नियम, 2012 नियम 4 (9)
- तुमच्या नियुक्तीच्या पत्राची प्रत पीडित आणि कुटुंबाला द्या, या खटल्यातली तुमची भूमिका त्यांना समजावून सांगा. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे तपास–सुनावणी प्रक्रियेची सखोल माहिती त्यांना द्या.
- आरोपीची अटक, दोषारोपपत्र दाखल करणे, न्यायालयीन प्रक्रिया याची माहिती पीडित, कुटुंबिय आणि तुम्हाला देणं पोलिसांसाठी बंधनकारक आहे. याचं पालन होतं की नाही याची खातरजमा करा.
- बालकाच्या मानसिक, शारीरिक आरोग्याची काळजी घ्या. त्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करा. वैद्यकीय तपासणी, स्थळ ओळक किंवा आरोपीची ओळख या दरम्यान पीडिताला, कुटुंबाला धमकी दिली जाणार नाही, त्यांच्यावर दबाव टाकला जाणार नाही याची खबरदारी घ्या.
- मुलगी असल्यास तिची वैद्यकीय तपासणी केवळ स्त्री डॉक्टरकडूनच होईल याची काळजी घ्या.

**(आधार देणारी व्यक्ती किंवा संस्थांना कदाचित साक्षीदार म्हणूनही कागदपत्रांवर सही करावी लागू शकते. )**

## 6. शाळा व्यवस्थापन–शिक्षकांची भूमिका



वाढत्या वयाबरोबर बालक घराइतकाच वेळ शाळेत घालवत असतं.शाळेच्या परिसरात किंवा शाळांमध्ये काम करणाऱ्यांकडून बालकांवर लैंगिक अत्याचार होणं, ही अलिकडच्या काळातली चिंताजनक बाब आहे. बाल लैंगिक अत्याचारांच्या बहुतेक प्रकरणांमध्ये शाळांच्या अपरिपक्व हाताळणीमुळं बालकांवरच्या आघाताची तीव्रता वाढते. आघात वाढते. शाळांमध्ये बालकांची काळजी घेणारी पुरेशी व्यवस्था नसणं हाच केवळ दुर्दैवाचा भाग नाही लैंगिक दुर्घटना घडल्यानंतर अनेकदा शाळा अशा प्रकरणांवर मौन बाळगतात किंवा हात झटकून टाकण्याचा प्रयत्न करतात; त्यामुळं अशा प्रकरणांचा धोका दुपटीनं वाढतो.एवढंच नव्हे तर काही शाळा थेट बालकांना किंवा पालकांनाच जबाबदार धरतात. बालकांचे काळजीवाहक किंवा शिक्षक या नात्यानं बालकं आणि पालक शाळेतल्या कर्मचाऱ्यांवर पूर्ण विश्वास टाकतात. बऱ्याचदा बालकं त्यांच्या पालकांशी बोलण्याआधी त्यांच्या एखाद्या समस्यांची चर्चा शिक्षकांसोबत करतात.बालकांच्या या विश्वासाची जपणूक करणं हे शाळा व्यवस्थापनाचं कर्तव्य आहे. बाल लैंगिक अत्याचाराची तक्रार आल्यानंतर शाळा व्यवस्थापनानं अत्यंत संयमानं, तत्परतेनं आणि पद्धतशीरपणे त्याला सामोरं जाणं हे खूप महत्त्वाचं आहे.

बालकांना अत्याचारांपासून संरक्षण देणारं बाल संरक्षण धोरण शाळांकडं असलं पाहिजे. यातून बालकांप्रती असणारी शाळांची बांधिलकी स्पष्ट होते. शाळेतला कर्मचारी वर्ग आणि शिक्षकांची जबाबदारी या धोरणात निश्चित केली पाहिजे. शाळेतल्या कर्मचारी ते व्यवस्थापनातल्या प्रत्येक घटकानं आणि शाळेच्या प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष संपर्कात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनं या धोरणाचा अवलंब केला पाहिजे. तसंच शाळांनीही या धोरणाची अंमलबजावणी कशी होते, हे स्पष्ट केलं पाहिजे.

**बाल संरक्षण धोरणात समाविष्ट करण्यासाठीचे काही मुद्दे**

बाल संरक्षण धोरण (सीपीपी) – बालकांच्या संरक्षणाची संस्थेची जबाबदारी निश्चित करणारं आणि त्यांच्या संरक्षणाची पद्धत ठरवणारा हा आराखडा आहे. जिल्हा बाल संरक्षण दलानं या धोरणाच्या अस्तित्त्वात येईल याची काळजी घेतली पाहिजे. जेजे नियम, 2016 नियम 23 (13) (iii)

## • 'शाळांनो, तुम्ही काळजी घेताय ना...'

- बाल संरक्षण धोरण
- बाल कल्याण समिती
- बाल संरक्षण अधिकारी
- आवश्यक माहिती, कर्मचाऱ्यांच्या चौकशीसाठी पोलिसांना अनुमती, कार्यकर्ते
- बाल संरक्षण धोरणासंबंधी बालकं, शिक्षक–कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळा
- शाळेत काम करणाऱ्या सर्वांमध्ये बाल संरक्षणाची जाणीव निर्माण करणारी व्यवस्था निर्माण करणं.
- बाल संरक्षण धोरणाचा आढावा आणि अद्ययावतीकरण.
- सूचना पेटी

वरीलपैकी एखादा मुद्दा जरी तुमच्या शाळा–संस्थेत नसेल तर तुम्हाला सुधारणा करणं आवश्यक आहे.

- शाळेशी संबंधित सर्व कर्मचारी, शिक्षक आणि कंत्राटी कामगारांची देखील पोलिस पडताळणी आवश्यक आहे. बालकांवर लैंगिक अत्याचार झालेल्या अनेक घटनांमधल्या गुन्हेगांराची पार्श्वभूमी गुन्हेगारी असल्याचं दिसून आलं आहे.
- शाळेतल्या प्रत्येकांनी बाल संरक्षणासंदर्भातल्या अटी–नियमांवर स्वाक्षरी केली पाहिजे. प्रत्येकाला ओळखपत्र असले पाहिजे.
- शिक्षक–कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्यातल्या नात्यात स्पष्ट सीमारेषा असली पाहिजे. मदतनीस किंवा अन्य सोबतीव्यतिरीक्त कोणीही एकट्या बालकाला स्वच्छतागृहात किंवा वर्गात घेऊन जाता कामा नये.
- वर्गात, शाळेच्या आवारात सीसीटीव्ही बसवले पाहिजेत. त्याच्या चित्रिकरणाची नियमित तपासणीही झाली पाहिजे.
- शाळेच्या आवारात बालकांचे छायाचित्रण करण्यासंदर्भात नियम असले पाहिजेत. बालकांच्या फोटोंचा वापर, शाळेच्या आवारात इंटरनेट व तंत्रज्ञानाचा वापर यावर बंधन असले पाहिजे.
- शाळेतून बाहेर पडणाऱ्या बालकासोबत त्याचे पालक किंवा अधिकृत व्यक्तीच असेल यावर काटेकोर लक्ष द्या.

## 7. बालक काळजी वाहक संस्थांमधले लैंगिक गैरवर्तन

### अ. संस्थेतल्या व्यक्तींकडून बालकांना धोका

- व्यवस्थापन आणि कर्मचारी – पूर्णवेळ–अर्धवेळ, पाहुणे शिक्षक–कर्मचारी निवासी–अनिवासी, व्यवस्थापन प्रमुख
- सहाय्यक, स्वयंसेवक, स्थानिक आणि परकीय दाते, कंत्राटी कामगार
- संस्थेत शिकणारी किंवा राहणारी अन्य बालकं.
- संस्था बाह्य व्यक्तींकडून धोका
- बालकांची ने–आण करताना संपर्कात येणाऱ्या इतर व्यक्ती, प्रशिक्षक, इत्यादी.
- कुटुंबातले सदस्य, नातेवाईक, बालकाच्या शेजारपाजारचे लोक

### ब. एखाद्या घटनेची तक्रार जेव्हा बालक कोणाजवळही करतं तेव्हा पुढील पायऱ्यांचा अवलंब करा.

- बालकाशी सविस्तर बोला आणि त्याला समुपदेशकाकडं घेऊन जा.
- संस्थेतल्या वरीष्ठ पदाधिकाऱ्यांना किंवा संस्थेबाहेरच्या जबाबदार लोकांना कळवा.
- जिल्हा स्त्री आणि बाल विकास अधिकाऱ्याला (डब्ल्यूसीडीओ) माहिती द्या.
- बालकाचा विश्वास असणाऱ्या व्यक्तीसोबत पीडिताला जवळच्या रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी घेऊन जा.
- बालक राहात असलेल्या नजीकच्या पोलिस ठाण्यात किंवा एसजेपीयूला वर्दी द्या.
- सीडब्ल्यूसीला माहिती द्या. पोक्सो कायद्यानं सीडब्ल्यूसीला कळवण्याचे बंधन पोलिसांवर घातलं आहे.

## 8. विशेष न्यायालयाची भूमिका

पोक्सो कायद्या अंतर्गत कलम 28 (1)) येणाऱ्या गुन्ह्यांची सुनावणी तत्परतेनं होण्यासाठी सत्र न्यायालयाला विशेष न्यायालय म्हणूननेमण्याचा अधिकार कायद्याने सरकारला दिला आहे.

पोक्सो कायदा, 2012 मध्ये अंतर्भाव असणाऱ्या कलम 3, 5, 7, 9, 12, 13, 14 आणि 15 अन्वये जेव्हा एखाद्या व्यक्तीविरोधात गुन्हा नोंदवला जातो, तेव्हाआरोपीनं गुन्हा केला आहे, गुन्ह्याचा प्रयत्न केला आहे, गुन्ह्यास मदत केली आहे हे विशेष न्यायालयानं गृहीतच धरायचं असतं. म्हणूनच निर्दोषत्व सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपीवर येते (कलम 29). जोपर्यंत सिद्ध होत नाही तोवरआरोपीची मानसिकता गुन्हेगारी स्वरुपाची असल्याचे देखील विशेष न्यायालयाने गृहीत धरायचे असते. अपराधी मानसिक अवस्थादेखील तोपर्यंत विरोधात सिद्ध होत नाही (कलम 30).

## 9. विशेष सरकारी वकिलाची भूमिका

पोक्सो अंतर्गत येणाऱ्या प्रकरणांच्या सुनावणीसाठी प्रत्येक विशेष न्यायालयांमध्ये विशेष सरकारी वकीलाची नियुक्ती केली असली पाहिजे. पोक्सो, कलम 32 (1) विशेष सरकारी वकीलांना जनसामान्यांच्या हिताचं रक्षण

करणं अपेक्षित असतं. चौकशी–तपासादरम्यान गोळा केलेली सर्व सामग्री न्यायालयासमोर ठेवून न्यायदानात मदत करणं हे त्याचं कर्तव्य असतं. तो निष्पक्ष आणि सत्याची बाजू घेणारा असला पाहिजे.

- सुनावणीची पहिली पायरी म्हणजे आरोपीच्या न्यायालयीन कोठडीची मागणी करणे होय.
- न्यायालयीन कोठडीसाठी पोलिसांनी थेट विशेष न्यायालयाकडे धाव घेतली पाहिजे.
- पोक्सो कायद्याअंतर्गत बाल अत्याचाराच्या गुन्ह्यांमधील आरोपीच्या जामीनाचा विचार करताना पीडित, कुटुंबाच्या सुरक्षेची काळजी सर्व संबंधित घटकांनी घेतली पाहिजे.

पीडित बालकाचे हक्क आणि प्रतिष्ठा यांचा आदर करणं आणि त्यांना आदराची वागणूक देणं तसेच सुनावणीदरम्यान संवेदनशिलता जपणं ही न्याय्य न्यायालयीन प्रक्रियेतली पहिली पायरी आहे. लैंगिक गुन्ह्यातील सुनावणीला सामोरं जाणाऱ्या बालकांसाठी कोर्टात साक्ष देण्याचा अनुभव तणावपूर्ण आणि त्रासदायक असू शकतो. यामुळं त्यांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया धोक्यात येऊ शकते. एवढंच नव्हे तर या मुळं बालकाला सत्य आणि न्याय मिळण्याची आशा देखील धुसर होऊ शकते. या पार्श्वभूमीवर बालकांना प्रश्न विचारताना काही मार्गदर्शक तत्त्वांचा अवलंब करणं अत्यावश्यक ठरतं.

**साक्षीदार बालक असेल तर 'शपथ' शब्दाऐवजी 'वचन' हा शब्द वापरण्याची पद्धत कायदेशीर व्यवस्थेत रुढ होत आहे.**




न्यायालयात आणलेल्या बालकाला घटनेसंदर्भात विचारणा करताना ती त्यांनी प्रत्यक्ष पाहिलीय का किंवा अनुभवली आहे का, खरं आणि खोटं यातला फरक उमजतो का हे जाणून घेणं आवश्यक ठरतं. सर्व प्रश्न बालवयाशी साजेसे असले पाहिजेत.

खोटेपणापासून सत्याची वेगळी ओळख बालकाला सांगता येते का हे निश्चित करण्यासाठी, परिस्थितीशी संबंधित प्रश्न विचारले पाहिजेत. उदाहरणार्थ, जर मी तुझ्या आईला सांगितलं की तू माझ्यावर चिडून ओरडलास तर ते खरं असेल की खोटं? किंवा जर तुझ्या बाबतीत काहीतरी वाईट घडलंय असं तू तुझ्या शिक्षकांना सांगितलंस पण प्रत्यक्षात तुझ्या बाबतीत तसं काही घडलेलंच नसेल तर मग तुझं बोलणं खरं की खोटं?

## 10. नोंदणीकृत बालक काळजीवाहक संस्था

शासनातर्फे किंवा स्वयंसेवकांतर्फे किंवा बिगर सरकारी संस्थआंतर्फे चालवल्या जाणाऱ्या सर्व बालक काळजीवाहक संस्थांची नोंदणी जेजे कायदा (कलम 41) अंतर्गत नोंदल्या गेल्या पाहिजेत.

पोक्सो कायद्या अंतर्गतनिवारा गृह/ बाल गृह इथं आणल्या जाणाऱ्या बालकांसंदर्भातले नियम कायद्याच्या कलम 19 (5) आणि (6) मध्ये स्पष्ट करण्यात आले आहेत. एसजेपीयू किंवा स्थानिक पोलीसांनी अशा गुन्ह्यांची नोंद

झाल्यापासून 24 तासांच्या आत पीडित बालकांच्या संगोपन आणि संरक्षणाची व्यवस्था करायची असते. यात त्यामध्ये बालकालानिवारा गृहात किंवा जवळच्या रुग्णालयात कलम 1 9 (5) आणणे अपेक्षित असते. याशिवाय, निवारा गृहाची आवश्यकता का आहे हे सीजेपीयू/स्थानिक पोलिसांनीसीडब्ल्यूसी आणि विशेष न्यायालयाला 24 तासांच्या आत कळवणे बंधनकारक आहे. निर्णय घेताना पुढील गोष्टी विचारात घेतल्या जातात –

- पीडिताची वैद्यकीय आवश्यकता, बालकाची तात्कालिक देखभाल आणि संरक्षण यांची गरज पुरवण्यासाठी पालकांची किंवाबालकाचा ज्याच्यांवर विश्वास आहे त्यांची क्षमता आहे का हे लक्षात घेतलं जातं.
- पालक,कुटुंबातील व्यक्ती आणि विस्तारित परिवारातले सदस्य यांच्या संपर्कात राहण्याची गरज बालकाला आहे का;
- बालकाचं वय आणिपरिपक्वता, लिंग आणि सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमीचा स्तर;
- बालक विकलांगता असेल तर;
- त्रासदायक ठरु शकणारा दीर्घकालीन आजारबालकाला आहे का;
- कुटुंबाला किंवा कुटुंबातल्या सदस्याला हिंसक घटनांची पार्श्वभूमी आहे का; आणि,
- इतर संबंधित घटक ज्यांचा परिणाम बालकाच्या दृष्टीनं आवश्यक हितसंबंधांवर होऊ शकतो का.

## 11. जिल्हा बाल संरक्षण दलाची भूमिका

बालकांच्या अधिकारांचं संरक्षण करण्याच्या जबाबदारीमध्ये जिल्हाबालसंरक्षणयोजना (आयसीपीएस) आणिजिल्हाबालसंरक्षणदल(डीसीपीयू) यांची भूमिका जेजे कायदा, 2015 मध्ये तपशीलवार विषद करण्यात आली आहे.प्रत्येकजिल्ह्यातलीडीसीपीयूजिल्हापातळीवर सगळ्या बालअधिकारआणिसंरक्षणउपक्रमांचा समनव्य साधेल आणि अंमलबजावणीकरेल. जेजेनियम 2016 च्या नियम 85 अन्वये जिल्हाबालसंरक्षण दलाची कार्यंपुढीलप्रमाणे आहेत.

1) मंडळानं आणि समितीनं पाठविलेल्या माहितीच्या आधारे कायदेशीर संघर्षात गुंतलेल्या बालकांबाबतचा तिमाही अहवाल तयार करणं

2) बालकांसाठी वैयक्तिककिंवासमूहसमुपदेशनआणिसमुदायसेवांचीव्यवस्थाकरणं.

3) घृणास्पद गुन्ह्यांमध्ये गुंतल्यानं कायदेशीर प्रक्रियेत अडकलेल्या सोळा ते अठरा वर्ष वयोगटातल्या बालकांसाठी बाल न्यायालयानं दिलेल्या निर्देशांनुसार वैयक्तिक संगोपनयोजना राबवणं.

4) सुरक्षीतठेवलेल्या प्रत्येक बालकाची माहिती दरवर्षी तपासून या संबंधीचा अहवालबालन्यायालयाला सादर करणे.

5) देखरेख अधिकारी म्हणून काम करु शकणाऱ्या व्यक्तींचीयादीतयार करुन वर्षातून दोनदा ती बाल न्यायालयाला पाठवणे.

6) बालसंगोपनसंस्थांमधून पळून गेलेल्याबालकांचंरेकॉर्ड अद्ययावत ठेवणं;

7) संगोपन आणि संरक्षणाची गरज असलेल्या जोखीमतल्या बालकं आणि कुटुंबांचा तपास करणं;

8) कठीण परिस्थितीशी झगडणाऱ्या बालकांचाजिल्हावार डेटाबेस तयार करुन बालकांवर ओढवणाऱ्या संकटांचा कल आणि प्रकार यावर लक्ष ठेवणे;

9) बालकांशी संबंधित सेवा आणि संसाधन निर्देशिका तयार करणे आणि ही माहिती वेळोवेळी समित्या व मंडळांनाउपलब्ध करुन देणं.

10) कायद्याच्या अंमलबजावणीसाठी जागरूकता निर्माण करणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन करणं, कायद्याशी संबंधित सर्व घटकांच्या क्षमतावृद्धीसाठी प्रयत्न करणं.

## 12. अत्याचारग्रस्त मदत योजना

### (अ) अंतरिम भरपाई

एफआयआर नोंदणीनंतर कोणत्याही क्षणी बालकाची पुनर्वसनाची तात्कालीक गरज भागवण्यासाठीपोक्सो नियम, 2012 च्या नियम 7 (1)विशेष न्यायालय अंतरिम भरपाईचा आदेश देऊ शकतं.

### (आ) अंतिम भरपाई

केवळ भरपाई देण्याचेच नव्हे तर ती नाकारण्यामागचीही कारणं न्यायालयानं जरुर नोंदवली पाहिजेत.

बालकावरीलशारीरिक किंवा मानसिक आघाताच्या भरपाईसाठी विशेष न्यायालय पात्र शिक्षेव्यतीरिक्त अतिरीक्त थेट देय भरपाईचा आदेश देऊ शकतं. कलम 33 (8)

गुन्ह्याचं गांभीर्य आणि तीव्रता, वैद्यकीय खर्च, आरोपीबरोबरचं त्याचं नातं, शिक्षण/रोजगाराचं झालेलं नुकसान, लैंगिक रोगांचा संसर्ग–एचआयव्ही एड्सची लागण, गर्भधारणा, पीडिताची आर्थिक स्थिती आणि इतर महत्त्वाचे मुद्दे लक्षात घेऊन विशेष न्यायालयानं भरपाईची तरतूद केली पाहिजे. पोक्सो कायदा, 2012 नियम 7 (3) शासनाच्या विविध योजनांमधून पीडिताला ही भरपाई दिली जाऊ शकते. पोक्सो कायदा, 2012 नियम 7 (4) विशेष न्यायालयानं आदेश दिल्यानंतर 30 दिवसांच्या आत शासनानं भरपाई द्यायची असते. पोक्सो कायदा, 2012 नियम 7 (5)

* * *



# BRIEF SUMMARY OF CRIMINAL LAW AMENDMENT ACT, 2018

The central Government has recently come with Criminal Law Amendment Ordinance, 2018 a new frame work relating to minor. The Bill now replace with Criminal Law Ordinance after the incident of rape and murder case of a minor girl in Kathau and in Unnau Rape case. This Amendment Act, 2018 is also known as Nirbhaya Act. These changes brought by way of an Amendment were never existed previously in Indian Criminal Laws. The Criminal Law Amendment Act, 2018 was promulgated on 21.04.2018.

This Amended Act amends certain laws related to rape of minors and has also added three important offenses relating to rape of minors. The bill amends relevant sections of Indian Penal Code, 1860., The Criminal Procedure Code, 1973. The Protection of Children from Sexual Offenses Act, 2012 & The Indian Evidence Act, 1872.The Amended Bill of 2018, stipulates minimum jail term of 20 years which may go up to life in prison or death sentence, for the rape of a girl under 12 years. Perpetrators who are involved in the gangrape of a girl below 12 years of age will get life imprisonment or death.The amendment under S. 376 additionally makes a provision for the fine to be payable to the victim. Thus, after amendment, it imperative for the Courts in cases of grant of bail to an accused under rape cases to give advance notice of the application for bail to the Public Prosecutor.

- ***Amendment in Indian Penal Code 1860-***

1) **Minimum 10 years of imprisonment for Rape of woman (Section 376 (1))-**

   **Earlier punishment-**

   Earlier punishment for rape of a woman was 7 years and as per new clause it has been made 10 years and fine. The punishment may extend up-to life imprisonment & fine.

2) **Minimum 20 years of imprisonment for Rape of girl below 16 years (Section 376 (2))-**

   The new clause (3) has been inserted in section 376 which provided minimum 20 years of imprisonment for rape of minor girl below age of 16 years. The punishment may extend up-to imprisonment of life and fine.

3) **Death Penalty Rape of girl aged below 12 years (Section 376 (AB)-**

   The new section 376 AB has been inserted after section 376 A of IPC. The new

section provided minimum 20 years of imprisonment for rape of a minor girl below age of 12 years. The punishment may extend up-to life imprisonment or death penalty.

4) **Life Imprisonment for Gang Rape of Girl Aged below 16 years (Section 376 (DA)-**

The new section 376 DA has been inserted to provide for life imprisonment for those involving gang rape of a girl below age of 16 years. It is also mentioned that life imprisonment shall mean imprisonment for the remainder of the natural life of convict and fine.

5) **Death penalty for Gang Rape of Girl Aged below 12 years (Section 376 (DB)-**

As per new section 376 DB has been inserted to provide for life imprisonment and fine for those involving gang rape of a girl below age of 12 years or it may extend to death penalty.

☐ ***Amendment in Criminal Procedure Code 1860 -***

The ordinance has reduced time period from three months to two with the objective to conduct speedy investigation of rape cases. The reduction of time period will also be applicable to sexual offenses relating to minor below age of 12 and 16 years. An amendment has been made to insert a sub-section which prescribes six months-time period to dispose of an Appeal against conviction. New section has been inserted after section 439 ofCr.P.C.No Anticipatory bail can be granted to a person accused of rape of girl of age less than 16 years. Regular bail applications U/sec 439 for persons accused under newly inserted offenses can be heard only after fifteen days advance notice to public prosecutor. New offenses are non-bailable and cognizable and triable by Court of Session.

☐ ***Amendment in Protection Of Child Sexual Offenses Act, 2012 Criminal Procedure Code 1860-***

Sec-42 of POCSO Act, 2012 has been amended to include newly inserted IPC provisions Sec 376A, 376 AB, 376B, 376C, 376 D, 376DA, 376 DB. Thus, POCSO Act is sought to be amended to clarify that greater amongst the punishments under IPC and POCSO will be applicable for the acts.

☐ ***Amendment in The Indian Evidence Act,1872 :***

In this Act there is provision it is mentioned that in sexual crime the factors like whether sexual act was consensual or not whether the past conduct of the victim was moral or immoral are to be disregarded. The same provision of Indian Evidence Act, 1972 has been extended to the sexual offenses of rape of minor below the age of 12 years and 16 years.

## Substantive Amendments:

| Section | Title | Old Position Under Indian Penal Code, 1860 | Changes made by Criminal Law Amendment Act, 2018. (21.04.2018) |
|---|---|---|---|
| 376(1) | Punishment of Rape of woman | Previously minimum punishment for Rape was seven years imprisonment | Now, minimum Punishment for Rape of woman is**10 years** imprisonment and it may be extendedup-to imprisonment of life. |
| 376 (3) | Punishment of Rape of a girl under 16 years of age | Did not Exist prior to Amendment | Now as per new sub-section minimum punishment for rape of a girl under 16 years is **20 years** and extended up-to imprisonment of life. |
| New Section 376 AB | Punishment of Rape of a girl under 12 years | Did not Exist prior to Amendment | Now as per new sub-section, a **rigorous imprisonment** of 20 years and of age it may be extended up-to imprison ment of life, along with fine to meet medical expenses and rehabilitation cost of the victim, or Death. |
| New Section 376 DA | Punishment of Gang Rape of a girl under 16 years of age | Did not exist prior to Amendment | **Life imprisonment,** along with fine to meet medical expenses and rehabilitation cost of the victim |
| New Section 376 DB | Punishment of Gang Rape of a girl under 12 years of age | Did not Exist prior to Amendment | **Life imprisonment**, along with fine to meet medical expenses and rehabilitation cost of the victim or **Death** |

## Protection of Children from Sexual Offenses Act, 2012

| | | | |
|---|---|---|---|
| Section 42 | Alternate Punishment | Where an act or omission constitutes an offense punishable under this act including those of rape, then the offender found guilty under the IPC, in case of degree of punishment is higher than in POCSO. | Applies to cases of Age below minor child below 12 and 16 |

## Procedural Amendments:

| | | | |
|---|---|---|---|
| Section 161 | Examination of witness by police | Examination by any police officer. | Statement of witness should be recorded by a woman police officer or any woman officer. |
| Section 173 | Report of police officer on completion of investigation | The investigation with respect to rape of a child may be completed within a period of **3 months** from the date on which officer in charge records statement | Now, the investigation with respect to rape of a woman & child under the age of 12 or 16 shall be completed within a period of 2 months from the date on which officer in charge records statement |
| Section 374(3) | Appeal from conviction | Any person convicted by the Session Sessions Court (if sentence is greater than 7 years) Or High Court May Appeal to Supreme Court respectively. | Appeal with respect to rape of a woman, rape or gang rape against a woman less than 12 years must be disposed of within 6 months from the date of filing of such appeal. |
| Section 438 (4) | Direction to grant bail to person appre-hending arrest | Did not exist prior to amendment | The provisions of anticipatory bail would not apply to those accused of raping women, or raping or gang raping women below age of 12 or 16 years of age. |
| Section 439 (4) | Special Powers of High Court & Court of Sessions | Do not exist prior to Amendment | Before granting bail to a person accused of raping a women or raping or gang raping women below age of 12 or 16, the Court will give 15 days' notice to Public Prosecutor |

**Expanded Sections:**

| Act | Section | Title | Original Position | Code of Criminal Procedure, 1973 |
|---|---|---|---|---|
| Indian Evidence Act, 1872 | 53A | Evidence of character or previous sexual experience not relevant cases | In a prosecution for certain offenses, including rape, where the question of consent is in issue, evidence of the character of the victim or of such person's previous sexual relevant on the issue of such consent or the quality of consent. | Now include Rape & Gang Rape of women under the age of 12 & 16 |
| Indian Evidence Act,1872 | 146 | - | In a prosecution for certain offenses, including rape, where the question of consent is in issue, it shall not be permissible to adduce evidence or to put questions in the cross- examination of victim as to the general immoral character, or previous sexual experience with any person shall not be relevant on issue of such consent or quality pf consent. | |
| Code of Criminal Procedure, 1973 | 26A | Court by which offences are to be tried | Any offence under the IPC it shall be tried as far as practicable by a Court | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Code of Criminal Procedure, 1973 | 154, 161 | Information incognizable cases, Examination of witness by police | If the information or statement against whom specific offenses (including rape) is alleged to have been committed or attempted, then such information or statement shall be recorded, by a woman police officer or any woman police officer | |
| Code of Criminal Procedure, 1973 | 197 | Prosecution of Judges and Civil Servants | When any person who is or was judge or Magistrate or a public Servant, not removable from his office, is accused of any offence alleged to have been committed by him while acting or purporting to act in the discharge of his official duty, no Court shall take cognizance of such offence except with the permission of Central or State govt. | |

Thus, this Bill is certainly a step forward to stop impartiality and injustice to the victims of Rape & Gang Rape. There is need to expand set-up of Fast Track Courts, Compensation to Rape survivors, witness protection in rape cases.

*****